दैनिक

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ६ वे अंक -१२ | गुरूवार,दि.१८ सप्टेंबर २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४

Beed | Daily Marathi | Year-6th | Issue-12 | Thursday, Dt.18 September 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# बीडच्या जनतेच्या स्वप्नपूर्तीचा ऐतिहासिक दिवस-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## अमळनेर (भां) ते बीड नवीन रेल्वे मार्गाचे उद्घाटन आणि बीड ते अहिल्यानगर रेल्वेचा शुभारंभ





### आजचा दिवस श्रेयवादाचा नसून आनंदाचा

रेल्वे संघर्ष समितीच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे आज हा दिवस शक्य झाल्याचे सांगुन मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, हा दिवस श्रेयवादाचा नसून आनंदाचा आहे. बीडमध्ये रेल्वे सुरू होणे म्हणजे फक्त गाडी पोहोचणे नव्हे तर विकासाची वाहिनी पोहोचणे आहे. सन २०१४ नंतर आमच्या सरकारने या प्रकल्पाला गती दिली. केंद्र व राज्याने ५० टक्के हिस्सा देत प्रकल्प पूर्णत्वाकडे नेला. रेल्वेचे विद्युतीकरणही लवकरच पूर्ण होईल आणि यामुळे प्रवास अधिक सोयीस्कर आणि वेगाने होईल. असे ते म्हणाले.

बीड : अनेक दशकांपासून बीडच्या जनतेने प्रतीक्षा केलेली रेल्वे आज बीड येथून सुरू झाली असून, बीडकरांना ऐतिहासिक भेट देत रेल्वेचे स्वप्न पूर्ण झाल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी दिवंगत गोपीनाथराव मुंडे, केशरकाकू क्षीरसागर यांचा मोठा वाटा असल्याचेही त्यांनी सांगितले.

अमळनेर (भां) ते बीड नवीन रेल्वे मार्गाचे उद्घाटन आणि बीड ते अहिल्यानगर रेल्वेचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रेल्वेला हिरवा झेंडा दाखवून केला. यानिमित्ताने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री श्रीमती पंकजा मुंडे, खासदार रजनी पाटील, खासदार बजरंग सोनवणे, आमदार सर्वश्री विक्रम काळे, धनंजय मुंडे, विजयसिंह पंडित, आमदार श्रीमती नमिता मुंदडा, विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिपचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, पोलीस अधिक्षक नवनीत काँवत, मध्य रेल्वे महाप्रबंधक धर्मवीर मीणा, विभागीय रेल्वे प्रबंधक राजेशकुमार वर्मा आदी उपस्थित होते.

### मराठवाड्यातील दुष्काळ संपवण्यासाठी वचनबद्ध

मराठवाडा मुक्ती दिन आणि रेल्वे प्रकल्पाचा आनंद दुहेरी असल्याचे सांगताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, गेल्या दहा वर्षांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मराठवाड्यासाठी रेल्वे प्रकल्पांना तब्बल २१ हजार कोटी रुपये दिले. ज्यामुळे विकासाच्या दिशा खुल्या झाल्या. सरकार मराठवाड्यातील दुष्काळ संपवण्यासाठी वचनबद्ध असून, पाण्याचे जाळे निर्माण करण्यासाठी कृष्णा व उल्हास खोऱ्यातील पाणी आणण्याचे मोठे प्रकल्प राबवले जातील. असे त्यांनी सांगितले.

विकास करत असतांना त्यातुन मार्ग काढावा लागतो, असे सांगुन श्री. पवार म्हणाले, बीड जिल्ह्याच्या विकास कामासाठी निधी कमी पडू देणार नाही. मोठ्या शहरातील रस्ते, मेट्रो, विमानतळ यासारख्या प्रकल्पाकडे लक्ष देत असतांना आमच्या ग्रामीण भागाचासुध्दा विकास झाला पाहिजे या दृष्टीने ग्रामीण भागातही रस्ते, दळणवळणासारख्या पायाभुत सुविधांच्या विकासासाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. या रेल्वेच्या माध्यमातून मराठवाड्याच्या विकासाचा, समृध्दीचा नवा अध्याय लिहिला जाईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. आजचा दिवस मराठवाड्याच्या रेल्वेच्या इतिहासातील स्वर्णीम दिवस आहे. बीड जिल्ह्याचा सर्वांगीण विकास हेच आपले ध्येय असल्याचे त्यांनी सांगितले.

खासदार रजनी पाटील, खासदार बजरंग सोनवणे यांनीही यावेळी आपले मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मध्य रेल्वेचे महाप्रबंधक धर्मवीर मिणा यांनी केले. डॅशबोर्डचे उद्घाटन आणि बीड शहर पोलीस स्टेशनचे व २४१ पोलीस निवासस्थानाचे उद्घाटनप्रारंभी मंचावर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या डॅशबोर्डचे उद्घाटन आणि बीड शहर पोलीस स्टेशनचे व २४१ पोलीस निवासस्थानाचे उद्घाटन ऑनलाईन पध्दतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. कार्यक्रमाला लोकप्रतिनीधी, विविध विभागाचे अधिकारी तसेच नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### राष्ट्रीय महामार्गासाठी सुमारे १० हजार कोटी रुपये निधी

मंत्री श्रीमती पंकजा मुंडे म्हणाल्या की, बीड येथे रेल्वेसाठी सर्व लोकप्रतिनीधीनी पुढाकार घेतला. रेल्वे ही नागरिकांच्या उन्नतीसाठी असणे आवश्यक आहे. विलासराव देशमुख आणि गोपीनाथराव मुंडे यांनी मराठवाड्यात रेल्वे आली पाहिजे यासाठी पुढाकार घेतला. बीड जिल्हा कष्टकऱ्यांचा आणि स्वाभिमानी लोकांचा आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी जिल्ह्यातुन जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गासाठी सुमारे १० हजार कोटी रुपये निधी दिला. बीडला रेल्वे यावी यासाठी अनेकांनी आपले योगदान दिले. जिल्ह्याच्या विकासासाठी आपलेही योगदान देण्याची तयारी आहे. जिल्ह्यावर मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी कृपादृष्टी ठेवावी अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली.

### बीड जिल्ह्याचा सर्वांगीण विकास हेच आपले ध्येय

उपमुख्यमंत्री श्री. पवार यावेळी म्हणाले की, आता जनतेचे प्रश्न सोडवायाचे आहेत. ३० ते ३५ वर्षानी रेल्वेचे हे काम झाले आहे. या कामासाठी विलंब झाला आहे. यासाठी आत्मचिंतन करण्याची गरज आहे. पुर्वीचा काळ व आजचा काळ यामध्ये मोठा फरक आहे. आज कृत्रिम बुध्दीमत्तेचा वापर होत आहे. ही रेल्वे पुणे आणि पुढे मुंबई पर्यंत घेवून जाण्यासाठी आपण प्रयत्नशिल आहोत. जिल्ह्यातील सहाही विधानसभा मतदारसंघातील कोणतीही विकास कामे अडणार नाही याकडे लक्ष देण्यात येईल. रेल्वेचे स्वप्न पूर्ण झाले असून आता विमानतळाकडे आपले लक्ष आहे. जिल्ह्यात उद्योगपती आल्यास उद्योग स्थापन करुन रोजगार उपलब्ध होतील. बीडमधील गोरगरिबांना उपचारासाठी मुंबई-पुण्याला जाण्याची आवश्यकता पडणार नाही. यासाठी येथेच आरोग्याच्या चांगल्या सुविधा निर्माण करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# बीडला प्रगत जिल्ह्याच्या अग्रस्थानी आणणार उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजीत पवार

## मराठवाडा मुक्ती संग्राम दिन ध्वजारोहण कार्यक्रम







बीड (प्रतिनिधी)

जिल्ह्यातील प्रत्येक कुटूंबाचे स्वतःचे घर असले पाहिजे हे आपले ध्येय आहे. जिल्ह्यात विविध उपक्रम आणि प्रकल्पाच्या माध्यमातून बीडच्या विकास यात्रेची नवी सुरुवात झाली आहे. आपण सर्वजण मिळून जिल्ह्यात तंत्रज्ञानाच्या साहाय्याने शेती-उद्योग-शिक्षण-आरोग्य-पर्यावरणासह सर्वच क्षेत्रात बीड जिल्ह्याला प्रगत जिल्ह्याच्या अग्रस्थानी आणणार असल्याची ग्वाही उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजीत पवार यांनी दिली.

आज मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त पोलीस मुख्यालयाच्या पोलीस कवायत मैदानावर राष्ट्रध्वजारोहण केल्यानंतर उपस्थितांना संबोधित करताना श्री. पवार बोलत होते. यावेळी आमदार सर्वश्री विक्रम काळे, धनंजय मुंडे, विजयसिंह पंडित, उपमुख्यमंत्री यांचे सचिव डॉ.राजेश देशमुख, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन,जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

श्री. पवार म्हणाले, मराठवाडा मुक्तीसंग्राम हा मराठवाड्यातील जनतेचा लढा होता. अंबाजोगाई आणि बीड या लढ्याचा केंद्रबिंदू होता. हा लढा लोकांनी त्यांच्या गावा-गावात लढवला. या लढ्यात मराठवाड्यातील सामान्य शेतकरी, कष्टकरी, महिला मोठ्या संख्येने सहभागी होते, त्यासाठी त्यांना मोठी किंमत चुकवावी लागली. हा संघर्ष केवळ राजकीय नव्हता तर तो सामाजिक समतेचा, स्वाभिमानाचा आणि स्वातंत्र्याचा लढा होता असे सांगितले.

जिल्ह्याच्या विकासाबाबत बोलताना श्री. पवार म्हणाले की, मागील काही महिन्यात

(उर्वरीत पान २ वर)

### योजनांच्या लाभाचे वाटप व विविध क्षेत्रातील व्यक्तीचा सत्कार

यावेळी पालकमंत्री श्री. पवार यांच्या हस्ते मराठा समाजाला आरक्षण मिळावे म्हणून आत्महत्या केलेल्या किंवा मृत्युमुखी पडलेल्या धीरज म्हस्के, महेश शेळके, सुनील वाकुरे आणि भागवत गायके यांच्या वारसांना मुख्यमंत्री सहायता निधीतून मदतीच्या धनादेशाचे वाटप करण्यात आले. संजय मोरे, वसीम खान, मनीषा मस्के, कमलाक्षी देशमुख व अयोध्या बांगर यांना कायम शिक्षकांचे आदेश वाटप केले. यावेळी नैसर्गिक आपत्तीमध्ये पुरात वाहून गेलेल्या व्यक्तींचे बचाव कार्य करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये अंबाजोगाईचे सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषीकेश शिंदे, सिरसाळाचे मंडळ अधिकारी उमेश कुदळे, नाथ्राचे ग्राम महसूल अधिकारी कृष्णा मुंडे, परळी तहसीलचे महसूल सहाय्यक वसीम शेख, रामेवाडीचे राजाभाऊ पौळ, बाबूराव रुपनर, खामगावचे रुपचंद लाकडे, छोटुराम लाकडे, मारुती लाकडे, रूपेश लाकडे, दत्तात्रय गव्हाणे, दिलीप राठोड यांचा, छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत सेवा पंधरवडा शुभारंभ करुन लाभार्थ्यांना लाभ वाटप करण्यात आले. हैद्राबाद गॅझेटिअरमधील नोंदीनुसार कुणबी प्रमाणपत्र सतीष कदम, बाबुराव डोके, रघुनाथ कदम, व सतीष जाधव यांना वितरण करण्यात आले. सर्वांसाठी घरे या योजने अंतर्गत वाटप केलेल्या / अतिक्रमण नियमानुकल केलेल्या बप्पा ऊपळकर, अमजद पठाण, प्रकाश नरनाळे, बाबू मामडे, रियाज चाँद, गौतम साबळे, अशोक लोखंडे, संभाजी वाघमारे, कमलाकर वाघमारे, अशुकेत वैरागे, हनुमान वाघमारे, दिपक वाघमारे, सुनिल वाघमारे, अमोल वाघमारे, गोविंद वाघमारे यांना जमीनीचे पट्टे वाटप करण्यात आले. पाणंद रस्ते सातबारावर नोंदी घेतलेले व सातबारा व फेरफार वाटप विष्णु दुसांगे, संदिप महारनोर, असराबाई खेडकर यांना करण्यात आले. यावेळी पोलीस अधिक्षक कार्यालयास प्राप्त झालेल्या ४५ वाहनांचे व नगर परिषद बीड यांनी खरेदी केलेल्या वाहनांचे लोकार्पण पालकमंत्री यांच्या हस्ते करण्यात आले.



### स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची बीड येथून उपस्थिती

बीड (प्रतिनिधी)

केंद्र सरकारच्या आरोग्य मंत्रालयाने महिलांच्या आरोग्याचा आणि त्यांच्या सक्षमीकरणांचा विचार करुन सशक्त नारी, सशक्त परिवार या अभियानाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज मध्यप्रदेशातील धार येथुन करण्यात आले. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बीड येथुन ऑनलाईन पध्दतीने आपली उपस्थिती दर्शविली.

यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री श्रीमती पंकजा मुंडे, खासदार रजनी पाटील, खासदार बजरंग सोनवणे, आमदार सर्वश्री विक्रम काळे, धनंजय मुंडे, विजयसिंह पंडित, आमदार श्रीमती नमिता मुंदडा, विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन आदी उपस्थित होते.

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!

प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन

दहिवाळ सुवर्णकार

नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777

शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

6 x 6.5

संपादकीय

# चौकटीपलीकडचा शिक्षकी पेशा...

आधुनिक युगात शिक्षकांची भूमिका अधिक आव्हानात्मक झाली आहे. सध्याच्या तंत्रबदलत्या युगात शिक्षणाच्या कल्पना बदलत आहे. नवे शैक्षणिक धोरण, ऑनलाईन शिक्षण, कृत्रिम बुद्धिमत्ता, यंत्रशिक्षक, परदेशी विद्यापीठांचे भारतात झालेले आगमन अशा अनेक बाबींमुळे शिक्षकांना ऑनलाइन शिकवण, इंटरॅक्टिव्ह बोर्ड, शिक्षणासंबंधी मोबाइल ॅप्स आणि वेबसाइट्स यांचा खुबीने वापर करून अध्यापन करावे लागेल.

शिक्षक म्हणजे केवळ पुस्तकी ज्ञान देणारी व्यक्ती नाही, तर तो विद्यार्थ्यांच्या आयुष्याला दिशा देणारा एक शिल्पकार असतो. आजच्या आधुनिक आणि तंत्रज्ञानाच्या युगात शिक्षकांची भूमिका अधिकच आव्हानात्मक आणि महत्त्वाची झाली आहे. विसाव्या शतकात शिक्षणाच्या कल्पना पारंपरिक होत्या. सध्याच्या तंत्र बदलत्या युगात शिक्षणाच्या कल्पना बदलत आहेत. नवे शैक्षणिक धोरण, ऑनलाइन शिक्षण, कृत्रिम बुद्धिमत्ता, यंत्रशिक्षक (रोबोटिक), परदेशी विद्यापीठांचे भारतात झालेले आगमन अशा अनेक बाबींमुळे शिक्षकांना बदलावे लागणार आहे. ऑनलाइन शिकवण, इंटरॅक्टिव्ह बोर्ड, शिक्षणासंबंधी मोबाइल प्स आणि वेबसाइट्स यांचा वापर वाढला. शिक्षकांना या तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून विद्यार्थ्यांना शिकवण्याचे काम करावे लागेल. पारंपरिक शिक्षणपद्धती आणि नवीन तंत्रज्ञान यांचा मेळ घालणे हे आजच्या शिक्षकांपुढील मोठे आव्हान आहे. म्हणूनच आजच्या युगात शिक्षकांनी कसे असले पाहिजे, याबाबत सविस्तर विचार करणे गरजेचे आहे. दरवर्षी ५ सप्टेंबर हा दिवस आपल्या देशात शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. हा दिवस डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा आणि त्यांच्या योगदानाला सलाम करण्याचा दिवस आहे. ते एक महान शिक्षक, तत्त्वज्ञ आणि भारताचे दुसरे राष्ट्रपती होते. त्यांचे शिक्षणक्षेत्रातील योगदान अतुलनीय आहे. मात्र त्या पलीकडे जाऊन आजघडीला शिक्षकी पेशाचा विचार करणे आवश्यक आहे.

आजचे जग वेगाने बदलत आहे. माहितीचा महासागर इंटरनेटवर उपलब्ध आहे. अशा परिस्थितीत शिक्षकांनी केवळ पाठ्यपुस्तकांवर अवलंबून राहणे पुरेसे नाही. त्यांनी स्वतःला अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे. नवीन शोध, वैज्ञानिक प्रगती, सामाजिक आणि आर्थिक बदल याबद्दल त्यांना माहिती असणे गरजेचे आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्यांनी डिजिटल साक्षर असणे आवश्यक आहे. स्मार्ट बोर्ड, प्रोजेक्टर, ऑनलाइन लर्निंग प्लॅटफॉर्म आणि शैक्षणिक प्सचा वापर करून शिक्षण अधिक प्रभावी बनवता येते. विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता जागतिक घडामोडींची माहिती देणे, विविध विषयांवर ऑनलाइन संशोधन करण्यास प्रोत्साहन देणे हे आधुनिक शिक्षकांचे कर्तव्य आहे. पारंपरिक शिक्षणपद्धतीत शिक्षक हे केवळ ज्ञान देणारे होते, पण आजच्या युगात त्यांची भूमिका ज्ञान सोपे करून सांगणे आणि विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन करणे अशी झाली आहे. इंटरनेटमुळे आज माहिती सहज उपलब्ध असली तरी, त्या माहितीचे योग्य विश्लेषण करणे आणि तिचा योग्य वापर कसा करावा हे शिकवणे महत्त्वाचे आहे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये चिकित्सक विचार करण्याची क्षमता विकसित केली पाहिजे. प्रश्न विचारण्याचे, वाद-विवाद करण्याचे आणि स्वतःची मते योग्य प्रकारे मांडण्याचे स्वातंत्र्य त्यांनी विद्यार्थ्यांना दिले पाहिजे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या आवडीनिवडी आणि क्षमता ओळखून कारकिर्दीचा योग्य पर्याय निवडण्यास मदत केली पाहिजे. प्रत्येक विद्यार्थ्याची शिकण्याची गती आणि पद्धत वेगळी असते. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याकडे वैयक्तिक लक्ष देणे आवश्यक आहे.

## मराठवाडा मुक्तिसंग्राम लढ्यातील क्रांतीकारकांनी ध्येयनिष्ठेने निजामाच्या जुलमाच्या श्रृखंला तोडल्या: श्री नामदेवराव वाघ

# शिदोड येथील श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयात मराठवाडा मुक्ती संग्राम दिन मोठ्या उत्साहात साजरा !

बीड (प्रतिनिधी)

मराठवाडा मुक्तिसंग्राम लढ्यातील क्रांतीकारकांनी ध्येयनिष्ठेने निजामाच्या जुलमाच्या श्रृखंला तोडल्या होत्या. देशाच्या स्वातंत्र्यासाठी आणि मराठवाडा मुक्ती लढ्यात बलिदान देणा-या थोर देशभक्तांनी केलेले कार्य आणि त्यांनी दाखवलेला मार्ग प्रत्येक नागरिकांनी आपल्या जीवनात अंगिकारून उज्वल जीवन जगावे असे आवाहन शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव श्री नामदेवराव वाघ यांनी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या निमित्ताने शिदोड येथील श्री महालक्ष्मी विद्यालयात आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना केले. यावेळी ध्वजारोहण गावातील प्रतिष्ठित नागरिक तथा बीड शहरातील प्रसिद्ध उद्योजक श्री गणेश आबा कदम यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या प्रसंगी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून श्री पांडुरंग भाऊ शेंडगे, श्री आकाश भाई निर्मळ, श्री दत्तात्रय चव्हाण, श्री आत्माराम वाव्हळ आदी उपस्थित होते.

बीड शहरात पासून जवळच असणाऱ्या शिदोड येथील श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयात मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि मराठवाडा मुक्तिसंग्राम लढल्याचे प्रणेते स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर ध्वजारोहण गावातील प्रतिष्ठित नागरिक तथा प्रसिद्ध उद्योजक श्री गणेश आबा कदम यांच्या शुभहस्ते करण्यात आले. त्या नंतर आलेल्या मान्यवरांच्या स्वागत समारंभ नंतर मराठवाडा मुक्तिसंग्राम दिना विषयी शाळेतील विद्यार्थीनी कु. श्रेया कदम हिने विचार मांडले. तर इयत्ता नववीच्या विद्यार्थीनी कु. श्रेया कदम कु. अक्षरा साळुंके, कु. अक्षरा मस्के कु. प्रीती कांबळे यांनी देशभक्ती गीत सादर करून सर्वांना मंत्रमुग्ध केले. त्या नंतर शेकापचे भाई आकाश निर्मळ आणि श्री गणेश आबा कदम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना संस्थेचे सचिव श्री नामदेवराव वाघ सर यांनी म्हणाले की, मराठवाडा मुक्त करण्याच्या या लढ्यामागे क्रांतीकारकाच्या मनात एक मोठी प्रेरणा होती. या प्रेरणेतून त्यांच्या अंगी धैर्य,शौर्य निर्माण झाले. या ध्येयनिष्ठेने त्यांनी निजामाच्या जुलमाच्या श्रृखंला तोडल्या. या कार्यात गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी खंबीर भूमिका घेतली होती. खंबीर व पोलादी मन असणाऱ्या महापुरुषांचा, आदर्श देशभक्तांचा त्यांनी केलेले कार्य आणि त्यांनी दाखवलेला मार्ग आज प्रत्येकांनी आपल्या जीवन अंगिकारून उज्वल जीवन जगावे असे आवाहन श्री नामदेवराव वाघ यांनी यावेळी विद्यार्थ्यांना केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री वाव्हळ सर यांनी तर आभार श्री चव्हाण सर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्रीमती फाटे मॅडम, श्रीमती साळुंके मॅडम श्रीमती सानप मॅडम श्री गणेश गुजर यांच्या सह शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.




### यांच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार!

शालांत प्रमाणपत्र परीक्षा मार्च २०२५ मध्ये श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयातून प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या कु. अनुष्का धुमाळ, द्वितीय क्रमांक मिळवणारा मुळे, तृतीय क्रमांक मिळवलेल्या चिरंजीव शरद शेंडगे आणि चौथा क्रमांक मिळालेल्या कु. सपना शिंदे या विद्यार्थ्यांना शिदोड चे भूमिपुत्र तथा सध्या रायगड येथे स्थायिक झालेले सामाजिक कार्यकर्ते श्री आकाश भाई निर्मळ यांच्यावतीने स्मृतिचिन्ह देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सर्वांना या गुणवंत विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या.

# रेल्वेसाठी लढा उभा करण्यात मोठं योगदान देणाऱ्या जनतेतल्या खऱ्या नेत्याची कहानी

## १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनानिमित्त स्व. अमोल गलधर यांची छोटीशी आठवण

दिनांक १७ सप्टेंबर रोजी बीड मध्ये रेल्वे धावली आहे . देशाचे पंतप्रधान दिनांक १७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्तीसंग्रामाचा दिवशी ऑनलाईन हिरवा झेंडा दाखवत या बीडकरांच्या स्वप्नांना हिरवा कंदिल दाखवला आहे. या शुभारंभ सोहळ्याच्या कार्यक्रमाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार, आमदार धनंजय मुंडे, मंत्री पंकजा मुंडे,खासदार बजरंग सोनवणे, खासदार रजनीताई पाटील,माजी खासदार प्रितमताई मुंडे यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी उपस्थित आमदार सुरेश धस, संदीप क्षीरसागर, आमदार विजयसिंह पंडित, आमदार नमिताताई मुंदडा इत्यादी सह विविध राजकीय पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते .बीडच्या रेल्वेसाठी चा संघर्ष अनेकांचा अनेक वर्षांचा आणि काही दशकांचा आहे . पण बीडमध्ये रेल्वे येणार म्हटल्यावर खासदार नाना पाटील ,खासदार गंगाधर आप्पा बोरांडे, खासदार केसर काकू क्षीरसागर, खासदार रजनीताई पाटील,लोकनेते स्व. गोपीनाथरावजी मुंडे , माजी खासदार प्रितमताई मुंडे ,पंकजाताई मुंडे,खासदार बजरंग सोनवणे यांच्यानावासह अनेक राजकीय नेत्यांचे नावांसोबत एक नाव जोमाने पुढे येत. ते म्हणजे स्व.अमोल गलधर यांचं. बीड मधल्या प्रत्येकाला हे नाव परिचित आहे. कोण होते अमोल गलधर आणि त्यांच्या संघर्षाची कहाणी आपण आजच्या दैनिक समर्थ राजयोग मध्ये वाचणार आहोत.

बीड रेल्वेसाठी संघर्ष बीड मधल्या प्रत्येकानेच केला. मात्र अनेक राजकीय पुढाऱ्यांसोबत प्रत्येक लोकप्रतिनीधी यासाठी प्रयत्नशील राहीले. त्यामुळे सर्वच राजकीय पक्ष याचं श्रेय घेण्यासाठी मी म्हणत पुढे येत आहेत. अशात एका नावाचा उल्लेख राज्यासह जिल्हाभरात सर्वजण करत आहेत. ते म्हणजे स्व. अमोल गलधर ज्यांचं २०१० मध्ये एका घातपातात निधन झाले. बीडच्या कानाकोपऱ्यातून त्यांनी लोकांना रेल्वेच्या प्रश्नासाठी एकत्र केलं होतं. त्यांना रेल्वेप्रवासाचं महत्व पटवून दिलं. इतकच नव्हे तर लोकांना आंदोलनासाठी सुद्धा त्यांनी एकत्र केले. महाराष्ट्रभरातून बीडच्या तरुणांना एकत्र करुन त्यांनी रेल्वे बीड मध्ये आणण्यासाठीच्या आंदोलनाला एकत्र आणलं. शेतकरी कुटुंबातला ,बहूजन समाजातील तरुण तडफदार नेता ज्याने त्या काळातील रेल्वे मंत्र्यांनाही सोडलं नाही. प्रत्येकाला भेटून त्यांनी याचे रेल्वे पाठपुराव्यासाठी निवेदन दिले होते . मग त्या ममता बॅनर्जी असुद्या नाहीतर मग लालूप्रसाद यादव.




अतिशय आक्रमक आंदोलनासाठी अमोल गलधर हे ओळखले जाऊ लागले होते. एकदा तर त्यांनी ममता बॅनर्जी रेल्वेमंत्री असताना त्यांचा पुतळा जाळून त्याची राख शासकीय कार्यालयात पाठवली होती.तर बीडमधल्या आधार प्रतिष्ठानचे ते संस्थापक होते सोबतच राष्ट्रवादी विद्यार्थी आघाडीचं प्रदेश उपाध्यक्ष पद त्यांच्याकडे होतं. तरीही त्यांच्या रेल्वेसाठी केलेल्या आंदोलनाला सर्वपक्षीय नेते एकत्र यायचे. एका आंदोलनादरम्यान अशी परिस्थिती तयार झाली होती की, त्यावेळचे पोलीस अधिक्षक सुवेझ हक यांनी अमोल गलधर यांना अटक केली होती . त्यांची लोकप्रियता इतकी झाली होती की, अटकेची बातमी ऐकून बीडमध्ये परिस्थीती हाताबाहेर जाऊ लागली होती. त्यांचे कार्यकर्ते सार्वजनीक ठिकाणी दगडफेक करु लागले होते. संपुर्ण बीड बंद होण्याची परिस्थीती झाल्यामुळे शेवटी पोलीसांना अमोल गलधर यांना सगळ्यांसमोर आणावं लागलं. तेव्हा कुठे जाऊन सर्वजण शांत झाले होते.

आज बीडमध्ये रेल्वे धावताना बीडच्या प्रत्येक व्यक्तीला त्यांची आठवण आल्याशिवाय राहत नाही. लोकांचा प्रश्न व्यवस्थेपर्यंत पोहचवण्यासाठी त्यांनी टॉवर वर चढून शोले स्टाईल आंदोलन केलं. एकदा थेट आकाशवाणीच बंद पाडल्यामुळेही या प्रश्नाची खुप चर्चा झाली होती . आज ते हयात नसले तरी त्यांचे बंधू स्वप्निल गलधर सध्या राजकारणात सक्रिय आहेत. ते एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेचे नेते आहेत. सोबतच त्यांचे साथिदार राहीलेले तरुण आजही त्यांचे पराक्रम सांगतात. आणि बीडकरांच्या स्मरणात अमोल गलधर हे नाव कायमच कोरलं गेलं आहे.

तर मंडळी ही होती. बीडच्या रेल्वेसाठी लढा उभा करण्यात मोठं योगदान देणाऱ्या जनतेतल्या खऱ्या नेत्याची कहानी. तुम्हाला ही माहीती कशी वाटली. ते दैनिक समर्थ राजयोगला सांगा.धन्यवाद!

अनंत जाधव.प्रतिनिधी,
मो.नं-९०७५६७१२१२

पान १ वरून...

**बीडला प्रगत जिल्ह्याच्या....**

आपण अनेक ऐतिहासिक निर्णय घेतले आहे. बीड विमानतळ विकास प्रकल्प हाती घेतला आहे. जिल्ह्यातील युवकांना तंत्रज्ञान आधारित कौशल्य मिळावे म्हणून सिट्रीपलआयटी प्रकल्प उभारणीस गती देण्यात आली आहे. टाटा टेक्नॉलॉजीज आणि एमआयडीसी यांच्या सहकार्याने १९६ कोटी ९८ लक्ष रुपयांचा हा प्रकल्प लवकरच प्रत्यक्षात साकारणार असल्याचे ते म्हणाले.

श्री. पवार पुढे म्हणाले, आज मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या मुहूर्तावर बीड-अहिल्यानगर रेल्वेचा शुभारंभ होत आहे. दोन दिवसांपूर्वीच अहिल्यानगर-बीड-परळी रेल्वे मार्गाच्या उर्वरित कामासाठी १५० कोटी निधी वितरीत केला आहे. परळी वैजनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखड्याला सुधारीत ३५१ कोटी रुपयांची मान्यता देण्यात आली आहे. बीडच्या श्री कंकालेश्वर मंदिर परिसराचा विकास करण्यात येणार आहे. नवीन प्रशासकीय इमारत बीड येथे उभारण्यात येणार आहे. सहकार भवनाचीही इमारत उभारण्यात येणार आहे. जिल्हा क्रीडा संकुलासाठी अतिरिक्त २५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. परळीत नवीन पशुवैद्यकीय महाविद्यालयासाठी ५५० कोटी रुपये मंजूर केले असल्याचे श्री. पवार म्हणाले.

जिल्ह्यात पोलीस विभागाच्या विविध उपक्रमांमुळे नागरिकांचा विश्वास वाढला असून, गंभीर गुन्ह्यात घट झाली असल्याचे सांगून श्री. पवार म्हणाले की, जिल्ह्यात कायदा - सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या सूचना पोलिसांना देण्यात आल्या आहेत. पोलीस दलाच्या बळकटीकरणासाठी दर्जेदार वाहनांची खरेदी करण्यात आली आहे. अंबाजोगाई वैद्यकीय महाविद्यालय आणि जिल्हा रुग्णालयाच्या पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही असे पालकमंत्री श्री. पवार यावेळी म्हणाले.

मागणी दोन-तीन दिवसांपासून जिल्ह्याला मुसळधार पावसाचा तडाखा बसल्याचे सांगून श्री. पवार म्हणाले की, पुरामुळे नद्यांच्या पाणी पातळीत वाढ झाली, त्यामुळे जिल्ह्यातील काही नागरिकांचे तात्पुरते स्थलांतर करावे लागले. या परिस्थितीवर माझे मंत्रालयातून बारकाईने लक्ष होते. जिल्ह्यातील या परिस्थितीची माहिती जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक व अन्य वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून घेत होतो. पूरग्रस्तांना आणि बधितांना तातडीने मदत करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत शेतकरी, कष्टकरी आणि सामान्य नागरिकांना वाऱ्यावर सोडणार नाही. शेतपिकांचे आणि पशुधनाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अशा परिस्थितीत शासन शेतकरी आणि पशुपालकांच्या पाठीशी ठामपणे उभे असल्याची ग्वाही श्री. पवार यांनी यावेळी दिली.

पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर पालकमंत्री श्री. पवार यांनी ध्वजारोहण करुन, राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली. तसेच यावेळी पथ संचलनाचे निरीक्षण केले.प्रारंभी पालकमंत्री श्री. पवार यांनी प्रियदर्शनी उद्यानातील हुतात्मा स्मारकास पुष्पचक्र वाहून हुतात्म्यांना आदरांजली अर्पण केली. तर पोलिस जवानांनी हवेत बंदुकीच्या तीन फैरी झाडून व पोलिस बँड पथकाने शोक धून वाजवून हुतात्म्यांना मानवंदना दिली.

# खा.सोनवणे म्हणाले, रेल्वेची स्वप्नपुर्ती होतेय आता पाणी द्या, अन् फडणवीसांकडून दुष्काळमुक्तीचा शब्द

## रेल्वे मार्ग उद्घाटन अन् रेल्वे शुभारंभ प्रसंगी खा.सोनवणेंचे धडाकेबाज भाषण



बीड: बीडला रेल्वे यावी, यासाठी बीड जिल्हा रेल्वे कृती समिती आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांनी काम केले. अनेक वर्ष रेल्वेसाठी संघर्ष सुरू राहिला. दरम्यान, बीड रेल्वेचे स्वप्न आज पुर्ण होत आहे. आज अहिल्यानगर ते बीड रेल्वे सुरू झाली असून बीड ते परळीपर्यंत कामही गतीने सुरू आहे. रेल्वेची स्वप्नपुर्ती होतेय, मुख्यमंत्रीसाहेब आता बीडला २५ टिएमसी पाणी द्या, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी केले. यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भाषणात मराठवाडा दुष्काळमुक्त करण्याचे प्रयत्न सुरू आहेत, बीडलाही पाणी आणू, असा शब्द यावेळी दिला.



बीड येथील रेल्वे स्थानक येथे अंमळनेर ते बीड नवीन रेल्वे मार्गाचे उद्घाटन आणि बीड ते अहिल्यानगर रेल्वेचा शुभारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी व्यासपिठावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, मंत्री पंकजा मुंडे, खा.रजनीताई पाटील, आ.धनंजय मुंडे, आ.विजयसिंह पंडित, आ.नमीता मुंदडा, आ.काळे, माजी.आ.भिमराव धोंडे यांची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना खा.बजरंग सोनवणे म्हणाले, बीड जिल्ह्यातील नागरिकांना रेल्वे येत असल्याचा आज आनंद होत आहे. अंमळनेर ते बीड नवीन रेल्वे मार्गाचे उद्घाटन आणि बीड ते अहिल्यानगर रेल्वेचा शुभारंभ होत असून बीड रेल्वेसाठी कृती समितीने मोठे काम केले. यात नामदेवराव क्षीरसागर, हनुमंत उपरे, अमोल गलधर आदिंसह विविध क्षेत्रात काम करणाऱ्या जनतेने लढा उभा केला. त्याच मागणीचे आज आपण फलीत पाहत आहोत. मागील पन्नास वर्षांपासून आपण रेल्वेची मागणी करत होतो. आज रेल्वेची मागणी आणि स्वप्नही पुर्ण होत आहे. अहिल्यानगर ते परळी अशी रेल्वेची लांबी ही २६१ किलोमिटर आहे. त्यापैकी मार्च २०२४ पर्यंत ९९ किलोमिटर पुर्ण झाली आणि आपल्या कार्यकाळात आजपर्यंत ६७ लांबी पुर्ण झाली. ज्या दिवशी खासदार झालो, त्यानंतर पहिली बैठक रेल्वेची घेतली. तुमच्या सर्वांच्या आर्शीवादाने खासदार झाल्यानंतर मी सालगडी म्हणून काम करण्याचा प्रमाणिक प्रयत्न करत आहे. रेल्वे ट्रॅक टाकून घेण्यापासून प्रत्येक ठिकाणी येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी प्रयत्न करत आहे. आतापर्यंत १६ बैठका आपण घेतल्या. रेल्वे अधिकाऱ्यांपासून रेल्वेमंत्र्यांपर्यंत भेटत आहे. याच कारणाने आपल्या रेल्वेच्या कामाला गती मिळालेली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार हे आपल्याला निधी देत आहेत. बीडकरांची बार्शीनाक्यावरील थांब्याची मागणी आहे, त्यासाठी आपला प्रस्ताव गेलेला आहे. रेल्वेमुळे विद्यार्थी, गोरगरिब आणि शेतकऱ्यांच्या मालाची ने-आण करण्यासाठी उपयोग होणार आहे. आता डिझेलवर रेल्वे सुरू होत आहे. परंतु हायस्पिड रेल्वे ही लाईटवर धावणार आहे. त्यासाठी आष्टी आणि सिरसाळा येथे दोन सबस्टेशन होत आहेत. ते काम लकवरच पुर्ण होईल. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री हे तिजोरीचे मालक आहेत, ते या कामासाठी हात मोकळे सोडतीलच, असा विश्वास आहे. दरम्यान, मराठवाड्याचा पाण्याचा अनुशेष भरून काढा. आम्हाला उजनीतून २५ टिमएसी पाणी मांजरा धरणात द्या आणि तिथून ते मांजरसुंब्याला आणि, जेणेकरून आमच्या बीड जिल्ह्यात कायमस्वरूपी दुष्काळमुक्त होईल, असे खा.सोनवणे म्हणाले.

### खा.सोनवणेंना रेल्वेप्रवासाचा मान

बीडला रेल्वे आलीच पाहिजे, अशी मागणी वर्षानूवर्षे सुरू होती. अखेर ही मागणी आता पुर्ण झाली असून दि.१७ सप्टेंबर रोजी बीड ते अहिल्यानगर अशी पहिली रेल्वे सुरू करण्यात आली. या पहिल्या प्रवाशी रेल्वेत खा.बजरंग सोनवणे यांनी प्रवास केला. त्यांच्यासोबत बीडमधील रेल्वेलढ्यात सहभागी झालेले नागरिक देखील सहभागी झाले होते.

### खा.सोनवणेंच्या पोस्टरने वेधले लक्ष

बीड येथील रेल्वे स्थानक येथील अंमळनेर ते बीड नवीन रेल्वे मार्गाचे उद्घाटन आणि बीड ते अहिल्यानगर रेल्वेचा शुभारंभ कार्यक्रमात खा.बजरंग सोनवणे यांचे 'कार्यक्षम खासदार' असे लिहलेले पोस्टर तरूणांनी आणले होते. अगदी सर्व कार्यक्रमात या पोस्टरने लक्ष वेधून घेतले होते. कार्यक्रमांसह रेल्वे प्रवासातही तरूण असे पोस्टर घेवून फिरताना दिसले. कार्यक्रमांदरम्यान, पोस्टर हातात घेत खा.बजरंग सोनवणे तुम आगे बढोच्या घोषणांनी यावेळी तरूणांनी दिल्या.

# बीड जिल्ह्याला रेल्वे येण्यामागे मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांचा महत्त्वाचा वाटा - रेल्वे आंदोलक अशोक हिंगे

बीड (प्रतिनिधी)

या ऐतिहासिक प्रकल्पाचे श्रेय विलासराव देशमुख यांच्या दूरदृष्टीला जाते.बीडमध्ये रेल्वे मार्ग यावा ही मागणी अनेक वर्षांपासूनची होती. २००५ पासून या मागणीने जोर धरला आणि विविध संघटनांनी तीव्र आंदोलने सुरू केली. विद्यार्थी कृती समिती, स्वातंत्र्य सैनिकांची समिती आणि ज्येष्ठ नागरिक कृती समिती यांसारख्या संघटनांनी विविध मार्गांनी सरकारचे लक्ष वेधून घेतले. यात टॉवरवर चढणे, आकाशवाणी आणि पोस्ट ऑफिस बंद पाडणे, तसेच जिल्हाभर बंद व रास्ता रोकोसारख्या आंदोलनांचा समावेश होता. या आंदोलनांमुळे बीडमध्ये रेल्वे मार्गाची गरज किती तीव्र आहे, हे स्पष्ट झाले.

या कालावधीत पवार आणि लालू प्रसाद यादव यांच्यासोबतची बैठक

३१ डिसेंबर २००८ रोजी, सर्व आंदोलकांनी संभाजीनगर (औरंगाबाद) येथे तत्कालीन केंद्रीय मंत्री शरद पवार यांची भेट घेतली. पवार साहेबांनी या प्रश्नात लक्ष घालण्याचे आश्वासन दिले आणि लवकरच रेल्वे मंत्री लालू प्रसाद यादव यांच्यासोबत बैठक घडवून आणली. या बैठकीसाठी विद्यार्थी, स्वातंत्र्य सैनिक, व्यापारी आणि स्थानिक लोकप्रतिनिधींचे एक मोठे शिष्टमंडळ स्वखर्चाने दिल्लीला गेले.

रेल्वे भवनमध्ये झालेल्या या बैठकीत, लालू प्रसाद यादव यांनी नगर-बीड-परळी रेल्वे मार्ग आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य नाही, असे स्पष्टपणे सांगितले. त्यांनी नमूद केले की, सध्या तोट्यातील रेल्वे मार्ग बंद केले जात आहेत आणि जर हा मार्ग सुरू करायचा असेल, तर एकूण खर्चाच्या ५० टक्के वाटा महाराष्ट्र सरकारने उचलावा लागेल. हा प्रस्ताव ऐकून शिष्टमंडळ निराश होऊन परत आले.दिल्लीहून परतल्यानंतर आंदोलकांनी आपले प्रयत्न पुन्हा मुंबईकडे वळवले. तत्कालीन पालकमंत्री स्वर्गीय पालकमंत्री विमलताई मुंदडा अमोल गलधर, माजी खासदार रजनीताई पाटील आणि माजी आमदार राजेंद्र जगताप अशोक हिंगे यांनी तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्याशी या विषयावर चर्चा करण्याची तयारी सुरू केली.

या प्रयत्नांचा भाग म्हणून, विलासराव देशमुख यांनी मुंबई येथे रेल्वे आंदोलक, स्वातंत्र्य सैनिक आणि लोकप्रतिनिधींची एक बैठक बोलावली. या बैठकीत सर्वांनी बीड जिल्ह्याच्या विकासासाठी रेल्वे मार्गाचे महत्त्व समजावून सांगितले. बीड जिल्ह्याच्या परिस्थितीची जाणीव असलेल्या देशमुख यांनी केंद्राच्या ५० टक्के खर्चाच्या प्रस्तावाला लगेचच हिरवा कंदील दाखवला. काही दिवसांतच त्यांनी नगर-बीड-परळी रेल्वे मार्गाच्या एकूण खर्चापैकी ५० टक्के वाटा महाराष्ट्र सरकार उचलणार असल्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आणि तसा ठराव केंद्राकडे पाठवला. जर विलासराव देशमुख यांनी हा निर्णय घेतला नसता, तर हा रेल्वे मार्ग बासनात गुंडाळून ठेवला गेला असता. त्यामुळे, या प्रकल्पाचे काम प्रत्यक्षात सुरू झाले आणि त्याला गती मिळाली. या ऐतिहासिक निर्णयामुळेच आज हा रेल्वे मार्ग पूर्णत्वास येत आहे. या यशाचे श्रेय केवळ तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या दूरदृष्टीलाच नव्हे, तर रस्त्यावर उतरून आंदोलन करणाऱ्या सर्व विद्यार्थी, युवक, ज्येष्ठ नागरिक, स्वातंत्र्य सैनिक आणि सामान्य नागरिकांनाही जाते, असे रेल्वे आंदोलक अशोक हिंगे यांनी म्हटले आहे.

# बीड रेल्वे स्टेशनला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्यासाठी बीड जिल्ह्यातील हजारो भीमसैनिक प्रशांत वासनिक यांच्या नेतृत्वात बीड रेल्वे स्टेशनच्या ठिकाणी जमा झाले




बीड /प्रतिनिधी

याप्रसंगी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाच्या घोषणा देण्यात आल्या. यावेळी रेल्वे अधिकारी त्याचबरोबर रेल्वे पोलीस अधिकारी यांनी रेल्वे स्टेशनला नाव देण्यासंदर्भात भीमसैनिकांचे म्हणणे ऐकून घेतले व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्यासाठी योग्य मार्गदर्शन देखील केले.

यानंतर देखील आंबेडकरी जनतेकडून मोठे आंदोलन करण्यात येणार आहे.

याप्रसंगी आंदोलनाचे प्रमुख प्रशांत वासनिक यांच्यासह तानाजी शिनगारे सुगत वाघमारे विशाल साबळे अमोल जाधव दीपक तांगडे गणेश खेबाडे भास्कर पिंपरीकर गणेश ढवळे सुजाता वासनिक मंदाताई मस्के निसर्ग ताई सुभाष गायकवाड आकाश शिंदे सुमेध वक्ते सह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# महावितरण अधिकारी व कर्मचाऱ्यांना निलंबन करण्यासाठी पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांना पत्रकार संघटनेचे निवेदन

## इंडियन जर्नलिस्ट एसोसिएशन या पत्रकार संघटनेचे पालकमंत्री पंकजा मुंडे यांना निवेदन

परतूर /तारेख शेख

दिनांक १७ सप्टेंबर २०२५ वार बुधवार रोजी सकाळी दहा वाजता जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजा मुंडे या मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त जालना येथे आल्या असता यावेळी त्यांना इंडियन जनरलीस्ट असोसिएशन चे अध्यक्ष आमेर खान व संघटनेच्या वतीने निवेदन देऊन मागणी करण्यात आली आहे की जालना येथे मस्तगड परिसरात असलेल्या महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांची



आरेरावी सध्या जास्त वाढली आहे ते ग्राहकांना तसेच पत्रकारांना सुद्धा आपमानास्पद व अर्वाच्य भाषेत बोलतात आवाच्या सव्वा बिले सध्या ग्राहकांना देत आहे,विज बिलाविषयी ग्राहकांना सहकार्य न करता दंडेलशाही पणा करतात यामुळे ग्राहकांना नाहक त्रास होत आहे.अधिकारी तसेच कर्मचारी कार्यालयीन वेळेत उपस्थित राहत नसल्याने ग्राहकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.त्यामुळे या संबंधित कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करावी यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना सुद्धा निवेदन यापूर्वी देण्यात आली असून आता पालकमंत्र्यांना सुद्धा निवेदन देण्यात आले आहे आणि एवढे होऊनही जर त्यांच्यावर कारवाई झाली नाही तर लोकशाही आंदोलन केले जाईल असा इशारा सुद्धा यावेळी पत्रकार संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे.निवेदनावर पंधरा ते सोळा पत्रकारांनी स्वाक्षरी केली असुन संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना निलंबित केले नाही तर २५ सप्टेंबर रोजी आंदोलन करण्यात येणार असल्याचे हि निवेदनात नमूद आहे.




## मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त हुतात्म्यांना आदरांजली व ध्वजारोहण समारोह

बुधवार, दिनांक १७ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ८.०० वाजता महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड मुख्य कार्यालय पणचक्की संभाजीनगर येथे मा. ना. समीर काझी साहेब , माननीय अध्यक्ष(राज्य मंत्री दर्जा) महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ संभाजीनगर यांचे शुभहस्ते ध्वजारोहण आयोजित करण्यात आला. त्या वेळी उपस्थित उप मुख्य कार्यकारी अधिकारी मुशीर अहेमद साहेब, विशेष अधिक्षक खुसरो खान साहेब व कर्मचारी, नागरीक उपस्थीत होते.

# मराठवाडा मुक्ती संग्राम दिन: अंबड येथील तहसील कार्यालयात ‘विजय’ ध्वज फडकला, शौर्याला सलाम!

अंबड /प्रतिनिधी

मराठवाड्याच्या अस्मितेचा, शौर्याचा आणि बलिदानाचा दिवस,१७ सप्टेंबर,अंबड तहसील कार्यालय मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला यानिमित्ताने तहसीलदार विजय चव्हाण यांच्या हस्ते तहसील कार्यालयावर तिरंगा फडकावून मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाला मानवंदना देण्यात आली. भारत माता की जय'च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.

यावेळी मराठवाड्याच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या वीरांच्या त्यागाचे स्मरण करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन लोकशाही मूल्यांचे जतन आणि सामाजिक एकोप्यासाठी कटिबद्ध राहण्याचा निर्धार व्यक्त केला.

या कार्यक्रमाला अंबड तहसील कर्मचारी, पुरवठा अधिकारी खांडेभराड, नायब तहसीलदार एकनाथ भोजने,मंडळ अधिकारी नरोटे, मंडळ अधिकारी माने, मंडळ अधिकारी बमनावत, मंडळ अधिकारी येडके,अंबड तहसील येथील निवडणूक नायब तहसीलदार श्री धर्माधिकारी. नायब तहसीलदार महसूल. एकनाथ भोजने.व संजय गांधी निराधार विभाग.श्री झोरे.श्री वानखेडे.श्री कराड व श्री श्याम भाऊ विभुते व अंबड तहसील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने



उपस्थित होते.व अंबड पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक संतोष घोडके,सहायक पोलिस निरीक्षक अमोल गुरले, पोलिस उपनिरीक्षक भगवान नरोडे,रंजना बांगलाने यांसह अनेक अधिकारी,पोलीस कर्मचारी व पत्रकार संरक्षण समिती अंबड तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर साळुंके, फारुक शेख, आकाश जळके, गोविंद खरात तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमामुळे केवळ तहसील कार्यालयातच नव्हे तर संपूर्ण अंबड शहरात देशभक्तीचे आणि चैतन्याचे वातावरण निर्माण झाले.मराठवाडा मुक्तीचा हा उत्सव भविष्यातही असाच प्रेरणा देत राहील.



गेवराई - तालुक्यातील सहशिक्षिका शोभना दळवी यांची बदली झाल्यानंतर विद्यार्थ्यांसह अख्खा गाव रडले. शिक्षकांच्या कार्याची हीच खरी पावती आणि आदर्श शिक्षक म्हणून पुरस्कार होय. बदली झाली, अनं गाव गहिवरले.

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-९०५ दि.१६.०९.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान पार्थ बालासाहेब गिरी, रा.वडीकाळ्या ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | पार्थ बालासाहेब गिरी | स्वतः | ०३.०८.२००७ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- १६/ ०९ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

# परतूर मंठा येथे अतिवृष्टीमुळे शेतकऱ्याचा मोठा नुकसान ओला दुष्काळ जाहीर करा अँड विलास राठोड अध्यक्ष परतूर मंठा विधानसभा युवक काँग्रेस

## शेतकऱ्याला तात्काळ अनुदान वाटप व पिक विमा अदा करून शेतकऱ्यांना सरसगट कर्जमाफी करा अँड विलास राठोड अध्यक्ष परतूर मंठा विधानसभा युवक काँग्रेस

परतूर /तारेख शेख

परतुर मंठा तालुक्यात जालना येथील अतिवृष्टीमुळे ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्याला तात्काळ अनुदान वाटप करा तसेच पिक विमा अदा करून शेतकऱ्यांना सरसगट कर्जमाफी करा तसेच

जालना जिल्ह्यात परतूर मंठा नेर शिवली येथे अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान झालेले आहे. परतूर-मंठा तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शेतात पिकांचे नुकसान झाल्यामुळे त्यांच्या व्यथा समजून घेण्यासाठी जालना जिल्हा युवक काँग्रेसच्या टीमच्या माध्यमातून शेताच्या बांधावर जाऊन शेतकऱ्यांच्या व्यथा समजून घेण्याचा प्रयत्न केला. आहे तसेच शेतकऱ्यांच्या हातातोंडी आलेला घास हिरावून नेला आहे. त्यामुळे शेतकरी उध्वस्त झालेला आहे आणि अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानाची भरपाई राज्य शासनाने पंचनामा न करता सरसकट केली पाहिजे व सरसकट कर्जमाफी सुद्धा केली पाहिजे असे युवक काँग्रेसच्या माध्यमातून आश्र्वासित करण्यात आले. शासनाकडून कोणतीही मदत न मिळाल्यास युवक काँग्रेसच्या माध्यमातून जिल्हा स्तरावर मोठ्या संख्येने आंदोलन उभारण्याचा इशारा सरकार ला देण्यात आला आहे तसेच उपविभागीय अधिकारी यांना युवक काँग्रेस कमिटीच्या माध्यमातून निवेदन देण्यात आला आहे की परतूर व मंठा तालुक्यात गेल्या एक महिन्यापासून सतत पाऊस पडत आहे, तसेच दिनांक १५/०९/२०२५ व १६/०९/२०२५ रोजी अतिवृष्टी झाल्यामुळे शेतकऱ्यांचे पिकांचे अत्यंत नुकसान झाले असून शेतकऱ्यांचे उभे पिके सोयाबीन, तुर, कापूस, मुग, उडीद, केळी, फळबाग या पिकांची नासाडी झाल्यामुळे हातातोंडी आलेला घास हिरावून नेला आहे. शेतकऱ्यांच्या हातास आलेला माल त्यांच्या डोळया देखत पावसाच्या पाण्यामुळे नष्ट झाला आहे. शेतकऱ्यांना झालेल्या आर्थिक नुकसान भरपाई देण्याकरीता शासनाने पिक विमा कंपनींना आदेशीत करावे व तात्काळ शेतकऱ्यांच्या खात्यावर पिक विमा जमा करण्यात यावा. शेतकऱ्यांनी सदर पिकांची मशागत, बि-बियाणे, खते घेण्याकरीता बँकेकडून कर्ज घेऊन पिकाची जोपासणा केली आहे, परंतु सदरच्या पिकांची काढणीपुवीच अतिवृष्टी अथवा नैसर्गीक आपत्तीमुळे शेतकऱ्यांची पिके पुर्णपणे नष्ट झाली आहेत त्यामुळे सदरील कर्ज माफ करण्यात येणे गरजेचे आहे व सरकारने कर्ज माफी संबंधाने दिलेले आश्वासन पाळण्यात यावे व अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचा परिणाम बघीतल्यास या दोन्ही तालुक्यात ओला दुष्काळ जाहिर करून कर्ज माफी करण्याची अत्यंत आवश्यकता आहे.शासनाने तात्काळ परतूर व मंठा तालुक्यात ओला दुष्काळ जाहिर करावा व सरसगट कर्ज माफ

करून शेतकऱ्यांना दिलासा देण्याचा यावा, अशी मागणी अँड विलास राठोड अध्यक्ष परतूर मंठा विधानसभा युवक काँग्रेस यांनी आपल्या टीम सोबत केली आहे यावेळी महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे सचिव चैतन्य



जायभाये, प्रदेश सचिव सुरेश वाहुळे, प्रदेश सचिव जफर खान, जालना युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष देवराज डोंगरे, जालना जिल्हा सरचिटणीस सचिन कचरे, परतुर विधानसभा उपाध्यक्ष वसीम जमीनदार, बाजीराव खरात, संतोष दिंडे, जुलकर वरफळकर ,रविराज आढे , शेतकरी व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२५/३९५
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :-१५/०७/२०२५

## कार्यालय नगर परिषद, अंबड

अर्जदार श्री./सौ.श्रीमती :- १) उषा अशोक पालवे,२) छाया अंकुश पालवे.

प्रकरण :- सर्व्हे नं.-३४/२ सहान प्लॉट नं.-४ न.प.मि.नं.-१८-९१-४ चे हस्तांतर करणे बाबत.

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र.(१८-९१-४) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला -------------------- येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतो ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिद्ध झाल्यापासून (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा.नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतु:सिमा:
पुर्व :- प्लॉट नंबर - ५
पश्चिम :- सर्व्हे नं.- ३४/२
दक्षिण :- ०९ मीटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता
उत्तर :- बाबुराव नाना वराडे यांची जमीन

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, अंबड**

# माहिती अधिकार महासंघाचे राज्यव्यापी अधिवेशन सोलापूर येथे संपन्न; उत्कृष्ट कार्यकर्ता म्हणून डॉ.गणेश ढवळे सन्मानित

बीड /प्रतिनिधी

माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ (फेडरेशन) ही महाराष्ट्रातील जागरूक नागरिक व माहिती अधिकार कार्यकर्त्यांची सर्वात मोठी संघटना असून, महासंघाचे राज्यव्यापी अधिवेशन दि.१४ सप्टेंबर रोजी शिवछत्रपती रंगभवन, सोलापूर येथे मोठ्या थाटामाटात संपन्न झाले.

या अधिवेशनासाठी राज्यातील ३५ जिल्ह्यांतील शेकडो कार्यकर्त्यांनी उपस्थिती लावली होती. अधिवेशनाचे उद्घाटन नाशिकचे सुप्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते व निर्भय महाराष्ट्र पार्टी चे संस्थापक अध्यक्ष जितेंद्र भावे यांच्या हस्ते डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन व दिप प्रज्वलीत करून करण्यात आले. शासन व प्रशासन भ्रष्टाचारमुक्त व



पारदर्शक करण्यासाठी संघर्ष करणे, तसेच निर्भयपणे लढा उभारण्याचे आवाहन त्यांनी या प्रसंगी कार्यकर्त्यांना केले.

महासंघाचे संस्थापक अध्यक्ष सुभाष बसवेकर यांनी शासनाच्या विभागातील अनेक ज्वलंत प्रश्नांवर त्याचप्रमाणे कार्यकर्त्यांवर खोटे गुन्हे दाखल करण्यात येत असल्याबाबत चर्चा करण्यात आली.कारवयकरत्यावर होत असलेले हल्ले, खोट्या केसेस तसेच अन्याय होईल तिथे आपली एकजूट दाखवून लढा द्यावा.असे प्रतिपादन केले.

या अधिवेशनात विविध सामाजिक विषयांवरील अनोख्या आंदोलनांच्या माध्यमातून सामान्यांचे प्रश्न सोडविणाऱ्या बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता व मुख्य प्रचार प्रमुख डॉ.गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांना उद्घाटक जितेंद्र भावे यांच्या हस्ते प्रमाणपत्र व सन्मान चिन्ह प्रदान करून विशेष सन्मान करण्यात आला.यावेळी माहिती अधिकार कार्यकर्ते हरिओम क्षीरसागर, जावेद सिद्दीकी आदी मान्यवर उपस्थित होते.या अधिवेशनात महाराष्ट्र राज्यातील मोठ्या संख्येने पदाधिकारी उपस्थित होते.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान ग्रामीण भागाच्या परिवर्तनाची दिशा

## जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींनी या अभियानात सक्रिय सहभाग नोंदवावा- उपमुख्यमंत्री अजित पवार

बीड - मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान म्हणजे केवळ स्पर्धा नसून ग्रामीण भागाच्या परिवर्तनाची दिशा आहे. गावातील प्रत्येकाने या परिवर्तनाच्या चळवळीमध्ये सहभाग घेतल्यासच आपल्या गावचा शाश्वत विकास होणार असल्याने जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींनी या अभियानात सक्रिय सहभाग नोंदविण्याचे आवाहन उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी केले. काकडहिरा येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. कार्यक्रमास आमदार सर्वश्री विक्रम काळे, धनंजय मुंडे, विजयसिंह पंडित, डॉ. योगेश क्षीरसागर,उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ.राजेश देशमुख,जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, गावच्या सरपंच प्रीती बागलाने, ह.भ.प.शिवाजी महाराज आदी उपस्थित होते.







उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, ग्रामविकासाठी शासनाने अत्यंत महत्वाचे पाऊल उचलत मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान राबविण्याचा निर्णय घेतला. दि. १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत हे अभियान राबविण्यात येणार आहे. राज्याच्या सर्वच जिल्ह्यात या अभियानाचा शुभारंभ करण्यात येत आहे. पुरस्काररूपाने या अभियानाला प्रोत्साहन देण्यासाठी २४५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तालुका, जिल्हा , विभाग तसेच राज्यस्तरावरून याचे मूल्यमापन करण्यात येणार असून या अभियानांतर्गत १ हजार ९०० हुन अधिक स्थानिक स्वराज्य संस्थांना पुरस्कार देण्यात येणार आहेत. यातून ग्रामपंचतीना विकासासाठी मोठा निधी प्राप्त होणार असल्याचे ते म्हणाले.

गावागावात सुशासन प्रस्थापित करून ग्रामस्थांमध्ये आत्मनिर्भरता निर्माण करणे आणि विकासासाठी स्पर्धात्मक वातावरण निर्मितीसाठी हे अभियान राबविण्यात येत आहे. अभियानात अतिशय निकोप स्पर्धा ठेवण्यात आली आहे. देशाचा सर्वांगिण विकास साधण्यासाठी गावचे प्रश्न सोडवून गावांचा शाश्वत विकास साधण्याची गरज आहे. शाश्वत विकासातून सद्याच्या पिढीच्या गरजा भागवतानाच पुढील पिढ्यांसाठी साधन संपत्तीचे संवर्धन सर्वांनी करण्याची गरज आहे. त्यामूळे गावाच्या शाश्वत विकासाला शासन प्राधान्य देत असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

उपमुख्यमंत्री श्री. पवार पुढे म्हणाले, सुशासनयुक्त पंचायत, सक्षम पंचायत, जलसमृद्ध, स्वच्छ व हरित गाव, योजनांचे अभिसरण, संस्थांचे सक्षमीकरण, उपजीविका विकास आणि सामाजिक न्याय आणि लोकसहभाग व श्रमदान हे या अभियानाचे सात प्रमुख घटक आहेत. या अभियानाच्या माध्यमातून प्रत्येक गावाने 'आमचे गाव, आमचा विकास' या भावनेतून पुढाकार घेण्याची गरज आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून पारदर्शक आणि लोकाभिमुख शासन आपल्या सर्वांच्या सहकार्याने निर्माण करायचे असून स्थानिक स्वराज्य संस्थांना सक्षम केल्याशिवाय शाश्वत विकास साध्य होऊ शकत नाही. या अभियानामुळे ग्रामपंचायतींना लोकसहभागातून गावचे नियोजन आणि सर्वांगिण विकास करण्याची संधी मिळणार असल्याचेही ते यावेळी म्हणाले.तत्कालीन गृहमंत्री स्व.आर. आर. पाटील यांनी संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानातून श्रमदान, लोकवर्गणी,लोकसहभागातून गावे स्वच्छ, सुंदर केली. वृक्षारोपणातुन पर्यावरणाचा समतोल राखण्याचे काम कशा पद्धतीने केले जाते हे दाखवून दिल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले. आपली भूमी साधू संतांची आहे. त्यांचे आचार-विचार आपल्या प्रत्येकाचे मनात रुजले आहेत. शिव-शाहू-फुले आंबेडकरांच्या विचाराने आपला महाराष्ट्र पुढे न्यायचा आहे. जातीय सलोखा निर्माण करत एकोप्याने राहून आपल्याला विकास साधायचा असल्याचेही ते म्हणाले.संपूर्ण जगात आपला भारत देश अग्रेसर ठेवण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी प्रयत्न करत आहेत. त्याचप्रमाणे आपल्या देशात आपले राज्य अग्रेसर राहावे यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करण्यात येत आहेत. महाराष्ट्र राज्यात आपला बीड जिल्हा अग्रस्थानी राहावा, यासाठी जिल्हा वासीयांच्या सहकार्याची अपेक्षाही त्यांनी यावेळी व्यक्त केली.बीड जिल्हा वासीयांचे रेल्वेचे स्वप्न आज पूर्ण होत असून या रेल्वेच्या प्रवासाचा वेळ कमी होण्यासाठी विद्युत व्यवस्थेवर रेल्वे चालवण्याची व्यवस्था करण्याबरोबर ही रेल्वे पुणे व मुंबई पर्यंत नेण्यासाठी सर्वंकष प्रयत्न करण्यात येतील, अशी ग्वाहीही त्यांनी यावेळी दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सरपंच प्रीती बागलाने यांनी केले. फुलंब्री तालुक्यातील किनगाव येथून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचा राज्यस्तरीय शुभारंभ करण्यात आला.

# २२ वर्षीय करणला, यकृताचा भाग देऊन भावाने दिले जीवदान !

## यकृत प्रत्यारोपण शस्त्रक्रियेसाठी मुख्यमंत्र्यांची मदत

प्रतिनिधी मुंबई : वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट येथील करण गजानन ठाकरे या तरूणाचे वैद्यकीय कारणास्तव यकृत निकामी झाले होते. गेली दोन वर्षांपासून तो या आजाराशी झुंज देत होता. यकृत प्रत्यारोपण शस्त्रक्रिया हा शेवटचा पर्याय डॉक्टरांनी सांगितल्याने उपचारासाठी लागणारा ३० लाख रुपये खर्च करणे शक्य नव्हते. घरची परिस्थिती बेताची असल्याने इतका मोठा निधी उभारण्याचे प्रश्नचिन्ह त्याच्या कुटूंबियांसमोर होते. यावेळी मुख्यमंत्री सहाय्यता निधी आणि धर्मदाय रुग्णालय मदत कक्ष यांनी ठाकरे यांच्या उपचाराचा मोठा खर्च उचलला. ३० लाख रुपयांपैकी कुटुंबीयांनी ५ लाख रुपये उभारले, मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून २ लाख रुपये तर उर्वरित २३ लाख रुपये धर्मादाय रुग्णालय मदत कक्षातून उपलब्ध करून देण्यात आले.

पुण्यातील सह्याद्री रुग्णालयात नुकतीच शस्त्रक्रिया यशस्वी झाली असून करण सध्या प्रकृतीस स्थिर आहे. वर्धा येथील ठाकरे यांना वडील नसल्याने घरची परिस्थिती बिकट आहे. त्यातच त्याच्या आईला पक्षाघात झाला आहे. त्यामुळे कुटुंबाची संपूर्ण जबाबदारी करणच्या खांद्यावर होती. अभियांत्रिकीच्या अंतिम वर्षात शिक्षण घेत असतानाच तो घरखर्चही भागवत होता. या विचित्र अशा परिस्थितीत डॉक्टरांनी यकृत प्रत्यारोपणाशिवाय पर्याय नसल्याचे स्पष्ट केले.त्यामुळे शस्त्रक्रियेचा प्रचंड खर्चाचा प्रश्न उभा राहिला होता.

या अशा बिकट परिस्थितीत करण यांचा मावसभाऊ चैतन्य बगाडे (वय २४, पुणे) यकृत दान करण्यासाठी पुढे आले. त्यांनी आपल्या यकृताचा भाग दान करण्याचा निर्णय घेतल्यामुळे प्रत्यारोपणासाठी मार्ग मोकळा झाला.या संपूर्ण प्रकरणात कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी तातडीने पुढाकार घेत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यांच्या प्रयत्नांमुळे प्रकरण मुख्यमंत्र्यांपर्यंत पोहोचले आणि त्वरेने निर्णय होऊन उपचारासाठी आवश्यक आर्थिक मदत उपलब्ध झाली.

या प्रकरणातून मुख्यमंत्र्यांची संवेदनशीलता, कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांची तत्परता आणि मावसभाऊचा त्याग या त्रिसूत्रीमुळे माझ्या भावाचा जीव वाचला अशी भावना गजानन यांची बहिणी अश्विनीने व्यक्त केली.

# मॉंसाहेब मिनाताई ठाकरे यांच्या पुतळ्याची विटंबना करणाऱ्या नराधमास अटक न केल्यास महाराष्ट्र पेटवू- जिल्हाप्रमुख गणेश वरेकर

बीड /प्रतिनिधी

मुंबई येथील शिवाजी पार्कच्या समोर असलेल्या तमाम शिवसैनिकांची मायमाऊली मिनाताई ठाकरे यांच्या पुतळ्याची अज्ञात व्यक्तीने लाल रंग टाकून विटंबना केल्याने अखंड महाराष्ट्रातील शिवसैनिक दुखावले गेले आहेत,आज हि बातमी समजताच बीड जिल्हा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर यांच्या नेतृत्वाखाली व तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन व तमाम शिवसैनिकांच्या उपस्थितीत सिद्धी विनायक कॉमलेकस जिजामाता चौक रोड येथे तीव्र आंदोलन करुन जाहीर निषेध करण्यात आला.



छत्रपती शिवाजी महाराज की जय,शिवसेना जिंदाबाद,मॉ. मिनाताई ठाकरे अमर रहे, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा विजय असो, उद्धवसाहेब ठाकरे तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है अशा गगनभेदी घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.यावेळी बोलताना जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर व तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन यांनी सांगितले की,आज सकाळी दादर येथील मिनाताई ठाकरे यांच्या पुतळ्याचे लाल रंग टाकून केलेलय विटंबनेचा आम्ही तीव्र शब्दात निषेध नोंदवत आहोत,या घटनेने आमच्या डोळ्यात अश्रू व अंगार आले असून आम्ही व्यथित झालो आहोत कारण मिनाताई आम्हा तमाम शिवसैनिकांच्या मनात मायमाऊली असुन आमची अढळ श्रद्धा त्यांच्यावर आहे,या घटनेने महाराष्ट्र शासनाच्या कायदा व सुरक्षा व्यवस्थेचे धिंडवडे निघाले आहेत,महान व्यक्तींनचे पुतळे सुरक्षित रहाते नसतील तर काय कायदा व सुरक्षा काम करत आहे, या राज्यात द्वेषभावनेचे राजकारण चालू असून ते बंद झाले पाहिजे, मिना ताईंच्या पुतळ्याची विटंबना करणाऱ्यांचा बंदोबस्त करुन जेरबंद न केल्यास शिवसैनिक महाराष्ट्र पेटविल्याशिवाय रहाणार नाहीत व बीड जिल्हातही त्याचा तीव्र परिणाम दिसून येईल असा इशारा यावेळी गणेश वरेकर यांनी दिला यावेळी युवा सेना बीड तालुका युवा अधिकारी बारिकराव येवले, तालुका सचिव नंदुभाऊ येवले, युवा नेते मुकेश भैय्या घुमरे,उपतालुकाप्रमुख रामनारायण जाधव, तालुका सहसचिव संदिप भानप, दत्ता सुरवसे , ज्ञानेश्वर सिंघन, राजेंद्र भोसले,रामा जाधव, बाळासाहेब बेंगडे ,समाधान हिंगणे, गोरख सोनसळे, तुकाराम धोंडकर ,अमर बांड , महेश जाधव ,बारिकराव येवले,अकाश घोरपडे,बाबु कुटे,केशव नागरगोजे, विनोद वरेकर यांच्यासह शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कार्डियाक कॅथलॅबमुळे गोरगरिबांना आरोग्याच्या सेवा अधिक दर्जेदारपणे मिळतील

## -उपमुख्यमंत्री अजित पवार

बीड दि.१७ सप्टेंबर (जिमाका) शहरी व ग्रामीण भागातील जनतेला पायाभूत सुविधांबरोबरच आरोग्याच्या सेवा अधिक चांगल्या पद्धतीने देण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. जिल्हा रुग्णालयातील कार्डियाक कॅथलॅबमुळे गोरगरीब रुग्णांना आरोग्याच्या सेवा अधिक दर्जेदारपणे उपलब्ध होणार असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांनी केले.कॅथलॅबसाठी आवश्यकता भासल्यास अधिकचा निधी मंजूर करू,अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

बीड येथील जिल्हा रुग्णालयात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते १८ कोटी ७२ लक्ष रुपये खर्चून उभारण्यात आलेल्या अत्याधुनिक कार्डियाक कॅथलॅबचे लोकार्पण श्री. पवार यांच्या हस्ते करण्यात आले. त्याप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी आमदार विक्रम काळे, आमदार संदीप क्षीरसागर,डॉ.योगेश क्षीरसागर,उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ.राजेश देशमुख,जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन,जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत,आरोग्य सेवेच्या उपसंचालक डॉ.रेखा गायकवाड,जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.संजय राऊत आदीची प्रमुख उपस्थिती होती.

मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या उपस्थित सर्वांना शुभेच्छा देत उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, राज्यातल्या प्रत्येक नागरिकाला आरोग्याच्या सेवा अधिक चांगल्या मिळाव्यात यासाठी आरोग्य सेवेचे सक्षमीकरण करण्यावर अधिक भर देण्यात येत आहे.प्रत्येक जिल्ह्यात वैद्यकीय महाविद्यालय उभारण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. प्रत्येक ठिकाणी नर्सिंग कॉलेज बरोबरच पॅरामेडिकल स्टाफ,नर्सेस,वैद्यकीय अधिकारीही उपलब्ध करून देण्यात येत आहे.अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय हे आशिया खंडातील पहिले महाविद्यालय असून या महाविद्यालयाच्या अद्यावतीकरणसाठी मुख्य आराखड्याचे सादरीकरण करण्यात आले आहे.या कामासाठी ११०० कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता आहे.त्याचबरोबर बीड येथील जिल्हा रुग्णालयात नर्सिंग महाविद्यालयासाठी इमारत,मुलींच्या वस्तीगृहासाठीही पोलीस विभागाच्या जागेची पाहणी करण्यात आली असून यासाठी १ हजार कोटी रुपयांची आवश्यकता आहे. जिल्ह्यातील जनतेच्या आरोग्याच्या दृष्टिकोनातून महत्त्वाच्या असलेल्या या आरोग्य सुविधांची कामे येत्या काळात पूर्ण करण्यासाठी सर्वंकष प्रयत्न करण्यात येतील,यासाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नसल्याची ग्वाही देखील उपमुख्यमंत्री श्री.पवार यांनी यावेळी दिली.

श्री.पवार पुढे म्हणाले की,जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्याचे निर्देश जिल्हा प्रशासनाला देण्यात आले असल्याचे सांगत अहिल्यानगर-बीड या रेल्वेचा शुभारंभ आज करण्यात येत आहे.या प्रवासासाठी लागणारा वेळ कमी करण्यासाठी ही रेल्वे विद्युत व्यवस्थेवर चालवण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील.भविष्यात ही सेवा पुणे आणि मुंबईपर्यंत घेऊन जात वाहतूक सेवा अधिक दर्जेदार करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतील,यासाठी सर्वांच्या सहकार्याची अपेक्षा व्यक्त करत क्रीडा संकुलात खेळाडू,नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी २५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे.लवकरच या कामाची सुरुवात करण्यात येणार आहे.जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी विमानतळ उभारणीसाठी जागेचे सर्व्हेक्षण करण्यात येत असल्याचेही ते म्हणाले.

यावेळी उपमुख्यमंत्री श्री.पवार यांनी कोनशीलेचे अनावरण करून व फीत कापून कार्डियाक कॅथलॅबचे लोकार्पण केले.तसेच संपूर्ण कॅथलॅबची पाहणी करून त्याठिकाणी देण्यात येणाऱ्या सुविधांची माहिती वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून जाणून घेतली.

या कार्यक्रमाला पदाधिकारी, अधिकारी तसेच वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.असे आहे कार्डियाक कॅथलॅब सर्वसामान्यांच्यादृष्टीने महत्वपूर्ण अशा कॅथलॅबमध्ये २४ तास कार्यरत कार्डिओलॉजीस्ट व भूलतज्ञ व डॉक्टर उपस्थित राहणार आहेत. कॅथलॅबमध्ये ॲन्जीओग्राफी, ॲन्जीओप्लासटी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. कॅथलॅबमध्ये १० बेडचे सुसज्य आय.सी.यू.असून कार्डियाक इको कार्डियोग्राफीची सोय करण्यात आली आहे.सुसज्य असे शस्त्रक्रिया गृह तयार करण्यात आलेले असून भविष्यात याच ठिकाणी ओपण हार्ट सर्जरीची सुविधाही उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

# श्री जुनेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा येथे बीज संकलन व प्रदर्शन

छत्रपती संभाजीनगर /प्रतिनिधी

आज वरुड काझी येथील पंडित दीन दयाल शिक्षण संस्था संचलित श्री जुनेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा येथे आज बीज संकलन व प्रदर्शन कार्यक्रम घेण्यात आला.असेच प्रदर्शन ५० शाळेमध्ये घेण्यात येत आहे.



प्रत्येक शाळेमधून कॉम्पिटिशन घेऊन विद्यार्थ्यांना बिया, झाडे यांची माहिती होण्याकरिता असे प्रदर्शन भरवण्यात येत आहे. वेगवेगळ्या शाळेत जाऊन विद्यार्थ्यांना प्रदर्शन व कॉम्पिटिशन बद्दल माहिती देणार आहे.

प्रत्येक शाळेमध्ये सहा विद्यार्थी वेगवेगळ्या पर्यावरण विषयक स्पर्धात्मक परीक्षेतून सिलेक्ट करून अशा तीनशे विद्यार्थ्यांची एक दिवसीय कार्यशाळा घेऊन त्यातील पाच विद्यार्थ्यांना निसर्ग सहल घडवण्यात येणार आहे.

पुढील दोन महिन्यात असे पन्नास शाळेमध्ये प्रदर्शन भरवण्यात येत आहे. आपण वुई वुई फॉर एन्व्हायरमेंट तर्फे २०० बियांचे संकलन करून, प्रत्येक बीजाची सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना करून देणार आहे. या प्रदर्शनाकरता गणेश कुलकर्णी , मेघना बडजाते , कमल पहाडे, वासंती देशपांडे, संजय अंबेकर,ज्योती अंबेकर यांची प्रमुख उपस्थिती होती त्याच बरोबर यांचे विशेष सहकार्य लाभले आहे.




हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).



बीड – २६ लाख लाडक्या बहिणींना भाऊ असल्याचे विश्वास देऊन मत सत्तेचा मलिदा खाण्यासाठी घेतली. आणि मलिद खाऊन झाल्यावर अपात्र असल्याचा साक्षात्कार झालाय. राज्यभरात अतिवृष्टीमुळे हाता तोंडाशी आलेला शेतकऱ्यांचा घास अस्मानाने हिरावला.ओला दुष्काळ आजच जाहिर करा आणि जायमोक्यावर आर्थिक मदत द्या. या करिता बीड मध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजितदादा पवार साहेब यांना जाब विचारण्या करिता पक्षाच्या वतीने आम्ही महिला लोकशाही मार्गाने आंदोलन करण्या करिता आलो. परंतु जनसुरक्षा कायदा लादुन लोकशाही दडपुन टाकण्याचं काम हे शासन प्रशासन करतंय मी यांचा जाहिर निषेध करतेय – अँड हेमाताई पिंपळे

# रस्त्यावर दगडगोट्यांचा नागरिकांना होता त्रास

दिंद्रुड /प्रतिनिधी

दिंद्रुडच्या बहुतांश रस्त्यांची गेल्या ६ वर्षांपासून दुरावस्था झाली होती.मधोमध दगड गोट्यांचा खच ये-जा करणार्यांना त्रासदायक ठरत होता.पावसाळ्यात तर सर्वांचे बेहाल होत होते.सामाजिक कार्यकर्ते कैलास ठोंबरे यांनी पुढाकार घेत हि रस्ते दगड व खड्डेमुक्त केली.

दिंद्रुड येथे ६ वर्षांपूर्वी ग्रामपंचायतने नळ योजनेसाठी गावातील सर्व क्राँक्रीट रस्ते फोडून खड्डे खणले ते भरल्यानंतर दगडगोटयांना भररस्त्यात पांगवल्याने चांगला रस्ता खराब झाले.ग्रामस्थांनी रस्तादुरूस्तीची मागणी वेळोवेळ करूनही यावर तोडगा काढण्यासाठी ग्रामपंचायतला अपयश



आले.पावसाळ्यात आबालवृद्धांना या रस्त्यांवरून जाताना अनेक त्रासाला सामोरे जावे लागत होते.येथील उद्योजक व सामाजिक कार्यकर्ते कैलास ठोंबरे यांनी स्वखर्चाने कामगारांकरवी हा प्रश्न सोडवला.रस्त्यावरील दगड गोटे खणून खड्डे भरण्यात आले.राममंदिरा समोरील नालीचे क्राँक्रीटीकरण चे काम ठोंबरे यांनी चालु केल्याने गावकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.माझे गाव स्वच्छ व सुंदर राहिल या भावनेने आपण हे काम करत असल्याचे कैलास ठोंबरे यांनी माध्यमांना सांगितले आहे.

# महिलेवर चाकूने हल्ला,महिला गंभीर जखमी

बदनापूर :-(प्रतिनिधी) बदनापुर तालुक्यातील बाजार वाहेगाव येथे (ता.१५)एकाने महिलेवर चाकूने हल्ला केल्याची घटना घडली आहे. बदनापूर पोलिसांच्या माहितीनुसार, फिर्यादी शारदा गजानन काळे (वय ३५ रा.बाजार वाहेगाव ता.बदनापूर जि.जालना) या त्यांच्या घरात असताना आरोपी मछिंद्र सांडू काळे (वय ४३ रा.बाजार वाहेगाव ता.बदनापूर) त्यांच्या घरासमोर येत शिवीगाळ करु लागला. पीडित शारदा काळे यांनी शिवीगाळ का करत आहे असे विचारायला गेल्यानंतर त्याने स्वतःजवळील असलेल्या चाकूने शारदा यांच्या गळ्यावर व हातावर वार करुन गंभीर जखमी केले आहे. यामध्ये त्यांच्या गळ्याला २८ तर हाताला १५ असे एकूण तब्बल ४३ टाके पडले आहेत. यावेळी त्यांना वाचविण्यासाठी गेलेल्या त्यांच्या सासूंच्या पोटावरसुद्धा चाकूने हल्ला करुन जखमी करण्यात आले.

या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून, या हल्ल्यात शारदा गंभीर जखमी झाल्या असून त्यांच्या फिर्यादीवरुन आरोपी मछिंद्र सांडू



काळे व भागवत मछिंद्र काळे या रा.बाजार वाहेगाव या दोन्ही बापलेकावर गुन्हा दाखल करण्यात आला असून हे दोन्ही आरोपी सध्या फरार झाले आहेत. त्यांना शोधण्यासाठी पोलिसांचे एक पथक रवाना झाले आहे. शारदा व त्यांच्या सासू यांच्यावर जालना येथील आधार हॉस्पिटलमध्ये अतिदक्षता विभागात उपचार सुरु आहेत.

पोलीस निरीक्षक एम.टी.सुरवसे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक ए.ए.राठोड पुढील तपास करत आहेत.



मुख्यमंत्री येणार म्हणून नाट्यगृहाच्या पुढील रस्त्याच्या मधोमध असलेल्या डीपीला चारी बाजूने बांबूचे कंपाउंड करून त्याला पडदा लावला होता जेणेकरून रस्त्यावरील डीपी मुख्यमंत्र्यांना दिसू नये

# स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियानांतर्गत महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर जाफराबाद

## ग्रामीण रुग्णालयात उपक्रम सुरू

जाफराबाद /प्रतिनिधी

दि.१५ जाफराबाद तालुक्यातील महिलांच्या आरोग्याबाबत जागरूकता वाढविणे आणि त्यांना दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी स्वस्थ नारी, सशक्त परिवार हे विशेष अभियान १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबरदरम्यान राबविण्यात येत आहे.या अभियानाची माहिती देताना ग्रामीण रुग्णालय जाफराबादचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.डी.एम.पाटील यांनी महिलांनी या उपक्रमाचा मोठ्या प्रमाणावर लाभ घ्यावा असे आवाहन केले.या शिबिरांमध्ये ग्रामीण व शहरी भागातील महिलांना मोफत तपासणी, उपचार आणि समुपदेशन सेवा पुरविण्यात येणार आहेत. यामध्ये विशेषत मुख,स्तन व गर्भाशयाच्या कर्करोगाची तपासणी गर्भवती महिलांची तपासणी व मार्गदर्शन किशोरवयीन मुलींसाठी मासिक पाळी स्वच्छता, पोषण, लसीकरण आणि समुपदेशन



एनसीडी तपासणी मानसिक आरोग्य तपासणी सर्वसामान्य आजारांवरील तपासणी व उपचार याशिवाय महिलांना आवश्यकतेनुसार औषधोपचारही पुरविण्यात येतील. विशेष शिबिर दिनांक

या अभियानांतर्गत २६ सप्टेंबर २०२५ रोजी ग्रामीण रुग्णालय जाफराबाद येथे तज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली मोठे आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले आहे. महिला कर्मचाऱ्यांची तपासणी अभियानाची सुरुवात म्हणून ग्रामीण रुग्णालयातील महिला कर्मचारी व अधिकारी यांची हिमोग्लोबिन व ब्लड ग्रुप तपासणी करण्यात आली. यामुळे गंभीर आजारांचे लवकर निदान होऊन वेळेवर उपचार सुरू करण्यास मदत होईल, असे अधीक्षक डॉ. पाटील यांनी नमूद केले.या कार्यक्रमात वैद्यकीय अधीक्षक डॉ. डी. एम. पाटील कार्यालयीन अधीक्षक श्री. शिवाजी नवले,वैद्यकीय अधिकारी डॉ.सावित्रा कदम, वैद्यकीय

# नऊ वर्षात तीनदा नदीला पूर आला

## शेतकऱ्याचा हाताशी आलेला घास हिरावला

दिंद्रुड: गेल्या नऊ वर्षात दिंद्रुड च्या सरस्वती नदीला तीनदा महापूर आला. या पुराचे पाणी शेतात शिरले अन् पिकांचे होत्याचे नव्हते झाले. ही आपबिती आहे माजलगाव तालुक्यातील नाकलगाव च्या शेतकऱ्यांची.

येथील शेतकरी राजू अशोक झोडगे, शिवाजी मुंजाबा झोडगे, सत्य प्रेम मुंजाबा झोडगे यांचे दिंद्रुड महसूल मंडळातील नाकलगाव शिवारात अनुक्रमे गट नंबर १५६, १५५, १५७, १५८ मध्ये ४ हेक्टर ८० आर शेतजमीन आहे.सरस्वती व लेंढी नदी काठावर असलेल्या या शेतीत नदीच्या महापुराचा सततचा धोका या शेतकऱ्यांना बसत आहे. २०१६,२०२१ व यंदा २०२५ साली आलेल्या महापुरात कापसाचे हातात तोंडाशी आलेले पीक वाहून गेले आहे. कष्ट व आर्थिक भुर्दंड सोसत पिकावर केलेला खर्च मातीत मिसळला असल्याने शेतकऱ्यात चिंतेचे वातावरण आहे. महापुरातील पाणी शेतातून वाट काढत कापसाच्या पीकाची नासाडी करत असल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत.पीकासोबत पशुधनासाठी ठेवलेला पशुचारा, शेती अवजारे, सोलार प्लेट या महापुरात वाहून गेल्या आसुन शासनाने आर्थिक मदत करण्याची मागणी सदर शेतकरी करत आहेत.

# सर्व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत करावी–सरपंच कमलबाई दगडू सुरवसे यांची मागणी

दिंद्रुड /प्रतिनिधी

गेल्या चार ते पाच दिवसांपासून दिंद्रुड व पंचक्रोशीत सर्व मंडळात मुसळधार अतिवृष्टी झाली आहे. हाता तोंडाशी आलेले कापूस सोयाबीनचे पिके पाण्यात गेल्याचे चित्र आहे. यामुळे शेतकऱ्याचे कंबरडे मोडणार असून प्रशासनाने तात्काळ पंचनामे करत नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत करण्याचे आवाहन दिंद्रुड च्या सरपंच कमलबाई दगडू सुरवसे यांनी माध्यमांद्वारे केली आहे.

सहा दिवसांच्या काळात दिंद्रुड व परिसरात मुसळधार अतिवृष्टी झाली. शेतातून अक्षरशः पुराचे लोंढे वाहात आहे जोमात असलेली पिके पाण्याखाली जाऊन पिकांची नासाडी झाल्याची परिस्थिती आहे. महसूल प्रशासनाने लवकरात लवकर पंचनामे करून शेतकऱ्यांना झालेल्या नुकसानीची भरपाई देण्यात यावी, पिकांना हमीभाव नसल्याने आधीच शेतकरी आर्थिक विवांचनेत आहे त्यातच दिंद्रुड परिसरात झालेली अतिवृष्टीमुळे उत्पन्नाचा धोका निर्माण झाला असून शासन प्रशासनाने याची दखल घ्यावी असे आवाहन दिंद्रुड च्या सरपंच कमलबाई दगडू सुरवसे यांनी केले आहे.

# जालना शहरात ढगफुटी सदृश्य पावसाने जलमय

## खा.डॉ. कल्याण काळे यांनी केली पाहणी, नुकसानग्रस्तांना तात्काळ मदतीचे निर्देश

जालना /प्रतिनिधी

जालना शहरात सोमवारी झालेल्या अचानक ढगफुटी सदृश्य मुसळधार पावसामुळे संपूर्ण शहर पाण्याखाली गेले.अनेक भागांमध्ये रस्ते,वस्त्या, बाजारपेठा जलमय झाल्या असून नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागले. बसस्थानक परिसर व लाकूड व्यापाऱ्यांना मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागले.

घडलेल्या परिस्थितीची माहिती मिळताच जालना लोकसभेचे खासदार डॉ.कल्याण काळे यांनी तात्काळ शहरातील बाधित भागांची पाहणी केली.त्यांनी साठे नगर,महानगरपालिका समोरील शिवशक्ती ग्रीन सिटी, कन्हैया नगर,बसस्थानक परिसर शनी मंदिर,भोईपुरा या भागांना भेट देऊन प्रत्यक्ष परिस्थितीचा आढावा घेतला.या वेळी त्यांच्या सोबत महानगरपालिका आयुक्त व अन्य अधिकारी उपस्थित होते.

बसस्थानकाजवळील लाकूड व्यापाऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. स्थानिकांनी संपर्क साधून ही बाब खासदार डॉ.कल्याण काळे यांच्यापर्यंत पोहोचवली.या नुकसानीचा अंदाज सुमारे २० लाख रुपये इतका असल्याचे व्यक्त करण्यात येत आहे.

घटनास्थळी पाहणी केल्यानंतर खासदार डॉ.कल्याण काळे यांनी जिल्हा प्रशासनाला तात्काळ कार्यवाहीचे निर्देश दिले.त्यानंतर मंगळवारी सकाळपासून महानगरपालिका व तहसील कार्यालयाच्या पथकांकडून नुकसानग्रस्त व्यापाऱ्यांच्या मालमत्तेचे पंचनामे सुरू झाले आहेत डॉ.कल्याण काळे यांनी स्पष्ट निर्देश दिले की ज्या भागात नुकसान झाले आहे, त्या सर्व भागांचे पंचनामे तातडीने व पारदर्शक पद्धतीने करण्यात यावेत.व्यापारी व नागरिकांना लवकरात लवकर नुकसानभरपाई देण्यात यावी.खासदारांच्या हस्तक्षेपामुळे प्रशासनाने हालचाल केल्याने व्यापारी व नागरिकांना दिलासा मिळाला असून, नुकसान भरपाईच्या अपेक्षेने सर्वांचे लक्ष आता जिल्हा प्रशासनाच्या पुढील निर्णयाकडे लागले आहे.

# पावसाने वाहून नेली दत्ता झिंजूर्डे यांच्या संत्र्याची बाग साडेसहा लाखांचे नुकसान



मानूर प्रतिनिधी ह्न

शिरूर कासार तालुक्यातील बोरगाव चकला येथील शेतकरी दत्ता झिंजूर्डे यांच्या संत्र्याच्या बागेला दोन दिवसांपूर्वी झालेल्या पावसाचा मोठा फटका बसला आहे. सुमारे एक एकर क्षेत्रातील संत्र्याची बाग व ठिबक संच पाण्याच्या प्रचंड प्रवाहात वाहून गेला असून शेतकऱ्याचे जवळपास साडेसहा लाख रुपयांचे नुकसान झाल्याचे समजते.

या बागेत २१२ झाडे होती. पावसामुळे ५० झाडे थेट जमिनीतून उपटली गेली तर उर्वरित झाडांनाही व फळांनाही मोठा फटका बसला आहे. शेतकरी झिंजूर्डे यांनी सहा वर्षांपूर्वी ही लागवड केली होती. त्यांनी जीवापाड जपलेली बाग अवघ्या काही तासांत पाण्याच्या प्रवाहात वाहून गेल्याने हतबल परिस्थिती निर्माण झाली आहे.

झिंजूर्डे यांनी शासनाकडे नुकसान भरपाईची मागणी केली असून बागेसाठी पुन्हा अनुदान मिळावे अशीही मागणी त्यांनी केली आहे. हातातोंडांशी आलेला घास पावसाने वाहून नेला, अशा शब्दांत त्यांनी आपली व्यथा व्यक्त केली.या घटनेमुळे परिसरातील इतर शेतकऱ्यांमध्येही चिंता पसरली असून, शासनाने तातडीने पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी होत आहे.

# भगवानराव लोमटे स्मृती राज्य पुरस्कार २०२५

अंबाजोगाई – यशवंतराव चव्हाण स्मृती समिती, अंबाजोगाईच्या वतीने दर वर्षी दिला जाणारा स्व. भगवानरावजी लोमटे स्मृती राज्य पुरस्कार यावर्षी ज्येष्ठ साहित्यिक व साहित्याचे अभ्यासक डॉ. वासुदेव मुलाटे यांना महाराष्ट्रातील थोर विचारवंत व महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणेचे अध्यक्ष डॉ. रावसाहेब कसबे यांच्या हस्ते व बीडचे माजी.आमदार राजेंद्र जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदान करण्यात येईल अशी माहिती यशवंतराव चव्हाण स्मृती समितीचे सचिव दगडू लोमटे यांनी दिली आहे.

शुक्रवार दिनांक १९ सप्टेंबर २०२५ सायंकाळी ५ वाजता आद्यकवी मुकुंदराज सभागृहात हा पुरस्कार वितरण समारंभ आयोजित केला आहे. सुसंकृत राजकारणी, साहित्य, क्रीडा, संगीत, सहकार, शिक्षण आदी क्षेत्रातील एका मान्यवरास हा पुरस्कार दिला जातो. या वर्षी साहित्य क्षेत्रातील योगदानासाठी डॉ. वासदेव मुलाटे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. पुरस्काराचे स्वरूप शाल, स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र, पुष्पहार, २५ हजार रुपये रोख असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

डॉ. वासुदेव मुलाटे हे एक महत्वाचे लेखक मराठी साहित्याच्या विश्वासात बीड जिल्ह्याने दिले आहेत. अंधाररंग, अबॉर्शन आणि इतर कथा, काळोखवेणा, झाड आणि समंध, व्यथाफूल हे कथा संग्रह व मराठवाड्याची कथा, ग्रामीण कथा : स्वरूप आणि विकास हे ग्रंथ आहेत. उलगुलान आणि तडजोड: एक आकलन, ग्रामीण साहित्य चळवळ एक ध्यासपर्व, ग्रामीण साहित्य : स्वरूप व दिशा, ग्रामीण साहित्य : चिंतन आणि चर्चा, चिंतनाच्या क्षितिजावर, झाकोळलेल्या वाटा हे आत्मकथन, दलितांची आत्मकथने : संकल्पना व स्वरूप, नवे साहित्य नवे आकलन, बिंब प्रतिबिंब, मनातलं आभाळ – ललित लेख, विषवृक्षाच्या मुळ्या – कादंबरी, शेतकऱ्यांचा असूड, शोध जाणिवांचा ही समीक्षात्मक, संशोधनात्मक ग्रंथा बरोबरच हार्ट क्रॅकर – विनोदी एकांकिका त्यांनी लिहिली आहे. असा एक महत्वाचा लेखक माजलगावच्या मातीत जन्मला, अमळनेरच्या विद्रोही साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते.

या पुरस्कार वितरण समारंभास अंबाजोगाईतील नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन समितीचे सचिव दगडू लोमटे, डॉ. कमलाकर कांबळे, सतीश लोमटे, प्रा सुधीर वैद्य, प्रा. भगवान शिंदे, डॉ. प्रकाश प्रयाग, प्रा. शर्मिष्ठा लोमटे, त्र्यंबक पोखरकर मार्गदर्शक भगवानराव शिंदे बप्पा व राजपाल लोमटे यांनी केले आहे.

# वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना परळी चे ऊस वाहतुकीच थकीत बिलासाठी आमरण उपोषण



वडवणी /प्रतिनिधी

मराठवाडा मुक्ती संग्रामा दिवशी तहसील कार्यालय वडवणी समोर भोरे सुर्यकांत देवराव रा. वडवणी ता. वडवणी यांचे वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना परळी ने ऊस वाहतूक चे बील अद्याप दिले नसल्यामुळे वडवणी शहरातील सुर्यकांत भोरे वाहतूक मालक यांचे २०२० ते २०२१ चे ऊस गळीत हंगामाचे ट्रॅक्टर = च-२/-११२८२ या ट्रॅक्टर ने बैनाथ सहकारी साखर कारखाना कि पांगेरी ता – परळी वै जि बीड येथे ट्रॅक्टर ने ऊस वाहतूक केलेली असुन यांना आज पर्यंत चे ऊस वाहतूक चे बील अद्याप दिले नाही . सुर्यकांत भोरे यांनी आमरण उपोषणाला बसून तहसील कार्यालय चे तहसीलदार साहेब यांना लेखी इशारा दिला आहे माझे उस वाहतुकीचे बिल येत्या १६/०९/२५ पर्यंत मिळाले नाही तर दि १७/०९/२०२५ रोजी पर्यंत आपल्या कार्यालया समोर आमरण उपोषण करण्यात येईल

# महाराणी ताराबाई विद्यालय व प्रमोद महाजन इंग्लिश स्कूलमध्ये १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात साजरा

## मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनी माजी आमदार केशवराव आंधळे यांच्या हस्ते वृक्षरोपण

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी शहरातील महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय आणि प्रमोद महाजन इंग्लिश स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचा ७७ वा वर्धापन दिनानिमित्त बुधवार दि.१७ सप्टेंबर २०२५ रोजी मुख्य ध्वजारोहण सोहळ्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

संस्कार शिक्षण मंडळाचे संस्थापक,सचिव तथा चौसाळा विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार केशवराव आंधळे यांच्या शुभहस्ते सरदार वल्लभाई पटेल,भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर,थोर क्रांती सेनानी स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेचे पूजन करून भारतीय राष्ट्रीय तिरंगा ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले राष्ट्रगान झाल्यानंतर त्यांच्या हस्ते शाळेच्या



प्रारंगणात वृक्षारोपण करण्यात आले.

याप्रसंगी संस्कार शिक्षण मंडळाचे अध्यक्ष श्री.अनिलदादा चोले, सेवानिवृत्त मुख्याध्यापक मधुकररावजी धस सर,श्री. दत्ताजी चोले,सेवानिवृत्त शिक्षक उत्तरेश्वररावजी धस सर,वडवणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे युवा संचालक रणजीत भैय्या धस,शाळेच्या संस्थेचे संचालक इंजि.अशोक भैय्या आंधळे,विद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती शोभाताई आंधळे-डोईफोडे मॅडम,उपप्राचार्य मस्के सर,पर्यवेक्षक धाईतिडक सर,श्री.डोईफोडे सर,आरएसपी प्रमुख श्री.ठोंबरे सर आदीमान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.अंडील जी.पी.यांनी केले तर उपस्थितांचे आभार क्रीडा शिक्षक निवडकर सर यांनी मानले. या कार्यक्रमासाठी राजकीय,सामाजिक,शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर तसेच पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ग्राहक तथा ठेवीदारांचा विश्वास व सहकार्य हाच पतसंस्थेचा मूलभूत पाया - माणिक वडवणकर

## श्री योगेश्वरी नागरी सहकारी पतसंस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ८% लाभांश जाहीर

पतसंस्थेची ३६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न

अंबाजोगाई (प्रतिनिधी):- पतसंस्थेचे ग्राहक तसेच ठेविदांचा विश्वास आणी सहकार्य हाच पतसंस्थेचा मूलभूत पाया असल्याचे मत संस्थेचे अध्यक्ष माणिक वडवणकर यांनी व्यक्त केले.ते मुकुंदराज स्वामी सांस्कृतिक सभागृहात आयोजित श्री योगेश्वरी नागरी सहकारी पतसंस्थेच्या ३६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत बोलत होते. मागील ३५ वर्षापूर्वी अतिशय अल्प गुंतवणूकीतून सुरू केलेली श्री योगेश्वरी नागरी सह पतसंस्था आज एका मिनी बँकेच्या स्वरूपात डामडोलात यशस्वी पणे कार्यरत आहे . संस्थापक अध्यक्ष , मार्गदर्शक राजकिशोर मोदी यांच्या कार्यकुशल मार्गदर्शनाखाली गेल्या ३५ वर्षापासून श्री योगेश्वरी पतसंस्था ग्राहकाना सेवा उपलब्ध करून देत आहे. याच पतसंस्थेची ३६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. यावेळी पतसंस्थेचे संस्थापक राजकिशोर मोदी, अध्यक्ष माणिक वडवणकर यांच्यासह उपाध्यक्ष मनोज लखेरा , संचालक कचरूलाल सारडा , ब्रम्हचारी इंगळे , सुनिल वाघाळकर , रूपेश चव्हाण , शेख अब्दुल करीम,शिरीष भावठाणकर , सय्यद अमजद,ऍड दयानंद लोंढाळ, जावेद गवळी तसेच




संचालिका कल्याणी देशपांडे आणि जयश्री घाडगे उपस्थित होते .

श्री योगेश्वरी नागरी सहकारी पतसंस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सुरुवात श्री योगेश्वरी देवीच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आली .पतसंस्थेचे सचिव गजानन कुलकर्णी यांनी मागील वर्षीच्या सभेचे इतिवृत्त आणि आजच्या सभेत चर्चेसाठी येणारे विषययांचे अवलोकन केले .

सन २०२४-२५ चा वार्षीक अहवाल पतसंस्थेचे अध्यक्ष माणिक वडवणकर यांनी सादर केला. संस्थेचा अहवाल सादर करताना विना सहकार नही उद्धार या ब्रीदवर चालणारी आपल्या विश्वासाची पतसंस्था म्हणजेच श्री योगेश्वरी नागरी सहकारी पतसंस्था होय अशी भावना त्यांनी व्यक्त केली . आज ठेवीदार तसेच ग्राहकांच्या सहकार्याने पतसंस्थेस ३६ वर्षे पूर्ण होत असून संस्थेचा अहवाल सादर करताना अत्यानंद होत असल्याचे माणिक वडवणकर यांनी सांगितले . योगेश्वरी पतसंस्थेने आजपर्यंत अनेक गरजवंताला यामध्ये मुख्यतः फिरते व्यापारी , छोटे व्यापारी , वैयक्तिक कर्ज , घर बांधणी कर्ज तसेच शैक्षणिक कर्ज आणि वाहन कर्ज वाटप केले आहेत. यामुळे शेकडो नागरिकांचे कुटुंबाचे आर्थिक स्थैर्य आज स्थिरावले असल्याचे देखील अहवाल सादर करताना अध्यक्ष वडवणकर यांनी अभिमानाने नमूद केले. पतसंस्थेच्या आर्थिक स्थितीमध्ये ३१ मार्च २०२५ अखेर पतसंस्थेच्या सभासदांची संख्या २२५१ एवढी असून संस्थेचे भाग भांडवल हे २ कोटी ५३ लाख रुपये असल्याचे स्पष्ट केले. ३१ मार्च २०२५ अखेर पतसंस्थेकडे ५२ कोटी ३५ लाखांच्या ठेवीमधून कर्जवाटप हे ४४ कोटी ६७ लाख रुपये एवढे केले असून अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेत २५ कोटी ४८ लाख रुपयांची गुंतवणूक केली असल्याचे वडवणकर यांनी उपस्थित ग्राहक तथा सभासदांना अवगत केले .

त्याचबरोबर दिनांक ३१ मार्च २०२५ अखेर पतसंस्थेस रुपये ८५ लाख २१ हजार रुपये इतका नफा झाला असल्याने ग्राहकांना ८% लाभांश देण्याचे देखील याप्रसंगी जाहीर केले. संस्थेचे वार्षिक लेखा परीक्षण होऊन संस्थेला ब वर्ग देण्यात आला असल्याचे सांगत अध्यक्ष माणिक वडवणकर यांनी आजमितीला पतसंस्थेच्या कार्यालयात ११ कर्मचारी आणि ०६ नित्य निधी ठेव प्रतिनिधी काम करत असल्याचे देखील सांगितले . शेवटी अध्यक्ष माणिक वडवणकर यांनी संस्थेचे संस्थापक, मार्गदर्शक राजकिशोर मोदी यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केल्यामुळे त्यांचे आभार व्यक्त केले . पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न करण्यासाठी संस्थेचे कर्मचारी



## क-हेवडगाव येथे पंतप्रधान मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सरपंच सौ.वंदना परिवंत गायकवाड यांच्या हस्ते शालेय साहित्याचे वाटप

आष्टी - (प्रतिनिधी) भारताचे लोकप्रिय व यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५ व्या. वाढदिवसा निमित्त आ. सुरेश धस यांच्या संकल्पनेतुन मंगळवारी सकाळी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त ध्वजारोहन झाल्यानंतर येथील जि. प. प्रा. शाळेतील विद्यार्थीना पेन, वही, कंपास पेटी, शालेय साहित्य वाटप करण्यात आले. कडा कृ. उ. बा. समितीच्या संचालिका तथा क-हेवडगाव ग्रामपंचायतच्या सरपंच सौ. वंदना परिवंत गायकवाड यांच्या हस्ते हे शालेय साहित्य वाटप करण्यात आले.

यावेळी सरपंच सौ. वंदनाताई परिवंत गायकवाड, ग्रामसेवीका दिपा गायकवाड, पोलीस उपनिरीक्षक बाबासाहेब उतम नागरगोजे, भगवान नाना सांगळे, जयदीप कंन्ट्रक्शन कंपनीचे संचालक परिवंत गायकवाड, हनुमान गायकवाड, सोमीनाथ विधाते, योगिनाथ बांगर, महेश सांगळे, गणेश टकले, जायभाय सर, संजय गायकवाड, श्रीधर खांडवे, उध्दव खांडवे, बंडुशेठ बांगर, पत्रकार अक्षय विधाते, किरण गायकवाड, सलवार शेख, प्रशांत बांगर, अमर शेख, हरी टकले, अशोक नागरगोजे, निलेश गायकवाड, शरद खांडवे, कुमार गायकवाड, शहादेव गायकवाड, बाळू गायकवाड, किसन गायकवाड, किरण बांगर, आप्पा बांगर, सागर खांडवे, जालीधर खांडवे आदि ग्रामस्थ उपस्थित होते.

# पात्रता धारण करीत नसल्याने तज्ज्ञ संचालकांची नियुक्ती रद्द करा

### सहाय्यक निबंधकांचे कै.डॉ.व्यंकटराव डावळे रूग्णलयीन कर्मचारी सहकारी पतसंस्थेला आदेश

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

पात्रता धारण करीत नसल्याने तज्ज्ञ संचालकांची नियुक्ती रद्द करा असे आदेश सहाय्यक निबंधकांनी कै.डॉ.व्यंकटराव डावळे रूग्णलयीन कर्मचारी सहकारी पतसंस्थेला दिले आहेत.

येथील कै.डॉ.व्यंकटराव डावळे कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित संस्थेत एकुण १३ संचालक आहेत. ज्यात ११ निवडलेले व २ तज्ज्ञ संचालक व कार्यलक्षी संचालक असे एकूण मिळून १३ संचालक आहेत. २०१४ या वर्षापासून स्विकृत संचालक करणे बंद केले आहे. ऐवजी तज्ज्ञ संचालक नव्याने संस्था नेमणूक करते. नियुक्ती केलेले संचालक हे पात्रता धारक नाहीत म्हणून या बाबत तक्रारदार माजी चेअरमन प्रताप चिंतामणी व महेंद्र मस्के यांनी सहाय्यक निबंधक यांना पत्र देवून कळविले होते. त्यावर सहाय्यक निबंधक यांनी तज्ज्ञ संचालक नियुक्तीबाबत संस्थेच्या उपविधी क्र.फ १.१ मधील स्पष्टीकरण क मधील दुसऱ्या परिच्छेदामध्ये नमुद केल्यानुसार सहकारी पतसंस्था/सेवक पतसंस्था/ सहकारी बँका/राष्ट्रीयकृत बँका/ व्यापारी बँका या मधील अनुभवी व्यक्ती, सनदी लेखापाल अशी पात्रता धारण करणाऱ्या व्यक्तीची तज्ज्ञ संचालक म्हणुन नियुक्ती करणे बाबत तरतुद स्पष्टपणे नमुद आहे. तथापि, कै.डॉ.व्यंकटराव डावळे रूग्णलयीन कर्मचारी सहकारी पतसंस्थेमध्ये तज्ज्ञ संचालक म्हणून नियुक्त केलेली व्यक्ती संस्थेच्या उपविधीतील उक्त नमुद केलेली पात्रता धारण करीत नसल्यास सदर व्यक्तीची नियुक्ती रद्द करण्याची कार्यवाही संस्था स्तरावरून तात्काळ करण्यात यावी असे आदेश सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था ता.अंबाजोगाई यांनी दिले आहेत. या बाबत आमच्या प्रतिनिधीशी बोलताना तक्रारदार माजी चेअरमन प्रताप चिंतामणी व महेंद्र मस्के यांनी सांगितले आहे की, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था ता.अंबाजोगाई यांनी नुकतेच ४ सप्टेंबर रोजी दिलेल्या आदेशानुसार कै.डॉ.व्यंकटराव डावळे रूग्णलयीन कर्मचारी सहकारी पतसंस्थेचे विद्यमान संचालक प्रकाश जव्हेरी यांचे पद धोक्यात आले आहे. तसेच लवकरच आणखी दोन संचालकांची पदे ही धोक्यात येणार आहेत अशी माहिती तक्रारदार माजी चेअरमन चिंतामणी व मस्के यांनी दिली आहे.

## बीड येथे होणाऱ्या नमो युवा रन मॅरेथॉनमध्ये युवकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे- संजय आंधळे

वडवणी /प्रतिनिधी

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त नमो युवा रन नशा मुक्त मॅरेथॉन चे बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे रविवार दि. २१ सप्टेंबर रोजी आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे व भाजपा जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्या उपस्थितीत नमो युवारन नशामुक्त भारत, मॅरेथॉन पार पडणार आहे तरी बीड जिल्ह्यातील तरुण, युवक, युवती, क्रिडापट्टु, धावपट्टु यांनी बहुसंख्येने सहभागी व्हावे असे आवाहन भाजपा युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष संजय आंधळे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.



देशाचे कणखर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त दि. १७ सप्टेंबर ते दि. २ ऑक्टोबर पर्यंत भारतीय जनता पार्टी पक्षाच्या वतीने सेवा पंधरवडा साजरा करण्यात येत आहे. त्याच अनुषंगाने भाजपा युवा मोर्चाच्या वतीने नमो युवारन, नशामुक्त भारत, मॅरेथॉनला पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे या हिरवा झेंडा दाखवणार आहेत.व भाजपा जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांची उपस्थिती लाभणार आहे. ही स्पर्धा बीड शहरातील छत्रपती शिवाजी चौकात सकाळी ७ वाजता पार पडणार आहे. या मॅरेथॉन मध्ये चार गट करण्यात आले आहे. वय १६ ते ३० वर्ष वयोगट, ओपन गट, महिलांसाठी वय १६ ते ३० वर्ष वयोगट, महिलांसाठी ओपन गट असे चार गट करण्यात आले आहेत. छत्रपती शिवाजी महाराज चौक ते चऱ्हाटा फाटा ते छत्रपती शिवाजी चौक असे ५ कि.मी रन असणार आहे. यामध्ये पारितोषिक ठेवण्यात आले असून प्रथम बक्षीस ५ हजार रुपये, द्वितीय ३ हजार, तृतीय २ हजार असे प्रोत्साहनपर बक्षीस देण्यात येणार आहे. व सहभागी धावपट्टू यांना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात येणार असून या स्पर्धेत बीड जिल्ह्यातील युवक, युवती, क्रीडापटू, धावपटू, डॉक्टर, वकील, पत्रकार, पोलीस व नागरिकांनी या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे अशा आवाहन भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष संजय आंधळे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.



## केज येथे मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनानिमित्त वृक्षारोपण कार्यक्रम

केज/प्रतिनिधी

दिनांक १७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिना निमित्ताने केज येथे वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला.हा उपक्रम होमगार्ड जिल्हा समादेशक श्री.सचिन पानकर साहेब व केंद्र नायक श्री.सुरेश झवेरी सर यांच्या आदेशानुसार राबविण्यात आला.या उपक्रमाचे आयोजन केज तालुका समादेशक राऊत दिनकर व सुनील कुलकर्णी,चाटे राजाभाऊ पलटण नायक,गणेश वाघमारे पालटण नायक व केज होमगार्ड पथक यांच्या वतीने करण्यात आले.

या वेळी तालुका समादेशक राऊत दिनकर यांनी सांगितले की,आज लावलेले झाड हे फक्त एक रोप नाही, तर उद्याच्यापिढ्यांसाठी आपले हिरवे वारस आहेत.मराठवाडामुक्ती संग्रामातील शूरवीरांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी त्याग केला,त्याच प्रेरणेने आपणही समाजासाठी,निसर्गा साठी योगदान देणे आवश्यक आहे.यापुढेही अशा उपक्रमांतून होमगार्ड दल समाजहितासाठी आणि पर्यावरण रक्षणासाठी सतत कार्यरत राहील.या कार्यक्रमात होमगार्ड पथकातील जवानांनी उत्साहाने सहभाग घेतला.

# महसूल प्रशासन व शासनाने दिलेल्या सूचनेनुसार राष्ट्रनेता मा. नरेंद्रजी मोदी यांचा जन्मदिन उत्साहात साजरा

अंबाजोगाई ( प्रतिनिधी)

( १७ सप्टेंबर) ते राष्ट्रपिता महात्मा गांधीजी यांचा जयंती दिवस (२ ऑक्टोबर) यांचे औचित्य साधून सेवा पंधरावडा चा शुभारंभ कार्यक्रम अंबाजोगाई तालुक्यात उत्साहात पार पडला. मराठवाडा मुक्ती संग्राम ध्वजारोहणाच्या कार्यक्रमानंतर सेवा पंधरवडा चे उद्घाटन समारंभ विधानसभा सदस्य मा . श्रीमती नमिताताई अक्षय मुंदडा , अपर जिल्हाधिकारी श्रीमती अश्विनी सोनवणे - जिरंगे, उपविभागीय अधिकारी श्री. दीपक वाजाळे यांच्या उपस्थितीत पार पडला.

नुकत्याच होऊन गेलेल्या गणेश उत्सव २०२५ मध्ये तालुक्यातील अधिकाऱ्यांनी व कर्मचारी यांनी कायदा व सुव्यवस्था व विसर्जनाचे सुयोग्य नियोजन केले होते. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून नगरपरिषद मुख्याधिकारी श्रीमती प्रियांका टोंगे,पोलीस निरीक्षक श्री शरद जोगदंड, स्वच्छता निरीक्षक श्री अनंत वेडे आणि स्वच्छता पर्यवेक्षक श्री.मल्हारी जोगदंड यांनी केलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले. तसेच महसूल व नगरपरिषद प्रशासनाच्या वतीने सन २०११



पूर्वीचे अतिक्रमण नियमानुकूल करून श्रीमती,ताराबाई घडवे, धनु डाके, अनंत होके, प्रशांत होके, सुमनबाई ढगे यांना पट्टे वाटप करण्यात आले. तसेच अंबाजोगाई तालुक्यातील अतिक्रमित शेत रस्ते मोकळे करून त्यांच्या नोंदी सातबारा वरील इतर हक्कात रस्त्याची नोंद घेऊन श्रीमती. विमल डुकरे रा. वरपगाव, श्री निवृत्ती भगत, श्री.रखमाजी शिंपले रा. चनई, श्री.विश्वंभर पिसाळ रा. कुंबेफळ या शेतकऱ्यांना सातबाराचे वाटप करण्यात आले. आगामी काळामध्ये १७ सप्टेंबर ते २२ सप्टेंबर या कालावधीत महसूल व भूमी अभिलेख विभागामार्फत अतिक्रमित क्षेत्र रस्त्यांची सीमांकन करणे त्यांना क्रमांक देणे कार्यवाही संपूर्ण तालुक्यात होणार आहे. २३ सप्टेंबर ते २७ सप्टेंबर या कालावधीत सर्वांसाठी घरे या मोहिमेअंतर्गत शहरी व ग्रामीण भागातील लोकांना मोठ्या संख्येने पट्टे वाटप करण्याचे नियोजन केले आहे. २८ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत महसूल मंडळ स्तरावर जनता दरबाराचे आयोजन, सस्ती अदालतीचे आयोजन तसेच छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत विशेष सहाय्य योजना मदत वाटप,ग्री स्टॅक नोंदणी, विविध शालेय प्रमाणपत्र वाटप, पुरवठा विषयक सेवा इत्यादींचा लाभ देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. विधानसभा सदस्य माननीय श्रीमती नमिताताई अक्षय मुंदडा यांनी या सेवा पंधरावडा चे सुरुवात झाल्याचे अधिकृतरित्या जाहीर केले. अप्पर जिल्हाधिकारी श्रीमती अश्विनी सोनवणे यांनी या सेवा पंधरवड्याच्या जास्तीत जास्त जनतेने सहभागी होऊन सेवांचा लाभ घेण्याबाबत आवाहन केले.उपविभागीय अधिकारी श्री. दीपक वजाळे यांनी सेवा पंधरावडाची विस्तृत माहिती दिली व प्रस्तावना केली.

याप्रसंगी गटविकास अधिकारी श्रीमती समृद्धी दिवाने , श्रीमती प्रियंका टोंगे मुख्याधिकारी , श्रीमती स्मिता बाहेती, श्री मिलिंद गायकवाड, श्री जिडगे, सचिन देशपांडे,नायब तहसीलदार, सर्व महसूल अधिकारी/कर्मचारी व तालुक्यातील सुजान नागरिक विविध पक्षाचे ज्येष्ठ पदाधिकारी, पोलीस अधिकारी उपस्थित होते. तहसीलदार श्री .विलास तरंगे यांनी सर्वांचे विशेष आभार मानले.

# मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त स्वानंद सार्वजनिक वाचनालयात ग्रंथप्रदर्शन,व्याख्यान,चर्चासत्र संपन्न

केज/प्रतिनिधी

स्वानंद सार्वजनिक वाचनालय,आनंदगाव ता.केज जि.बीड येथे मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त दिनांक १७ सप्टेंबर २०२५ रोजी ग्रंथप्रदर्शन,व्याख्यान, चर्चासत्र इत्यादी कार्यक्रम घेण्यात आले.

सर्वप्रथम मराठवाडा मुक्ती संग्रमाचे प्रणेते, स्वातंत्र्य सेनानी स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेला पुष्पहारअर्पण करून पुजन व वंदन करण्यात आले.त्यानतर ग्रंथप्रदर्शन,व्याख्यान, चर्चासत्र कार्यक्रमाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच सौ.अंजना गोविंद गायकवाड या होत्या. तर प्रमुख पाहुणे म्हणून ग्रामपंचायत अधिकारी डि.एस.सरदे,ग्राम पंचायतऑपरेटर विजय थोरात,सहशिक्षक अभिजित शिंदे, सुर्यकांत धायतिडक, रवि गायकवाड यांची उपस्थिती होती.यावेळी ग्रामपंचायत अधिकारी डि.एस.सरवदे यांनी गंथालयाच्या दैनंदिन कामकाजा बरोबरच विविध सामाजिक उपक्रम व सांस्कृतिक कार्यक्रम राबवून गावाला दिशा देण्याचे काम होत असल्याचे मत व्यक्त केले.यावेळी विजय थोरात, अभिजित शिंदे, सुर्यकांत धायतिडक, रवि गायकवाड यांनीही मनोगत व्यक्त केले. उद्घाटणीय सत्राचा अध्यक्षीय समारोप सरपंच सौ.अंजना गोविंद गायकवाड यांनी केला.दुसऱ्या सत्रात ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष,जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक,



परखड व्याख्याते प्राचार्य डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड यांचे व्याख्यान संपन्न झाले. आपल्या व्याख्यानात मराठवाडा निजाम शाहीत असल्यामुळे मागास राहिला व विकासापासून वंचित राहिल्याचे सांगून जेष्ठ स्वातंत्र्य सेनानी स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वात मराठवाडा १७ सप्टेंबरला मुक्त झाला. यासाठी अनेकांनी आपले बलिदान दिले आणि आपण हैद्राबाद च्या निजामशाहीतुन मुक्त झालो असे प्रतिवादन डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केले.यावेळी विचार पीठावर कमलाकर साबळे,रविंद्र गायकवाड,विजय गायकवाड,अरुण गायकवाड,बाळासाहेब गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यानंतर घेण्यात आलेल्या चर्चासत्रात रामकृष्ण तात्या गायकवाड,रविंद्र गायकवाड,बापूराव गायकवाड, कमलाकर साबळे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.ग्रंथप्रदर्शन, व्याख्यान,चर्चासत्र कार्यक्रमाला विठ्ठल भोगजकर,भास्कर गायकवाड,सुरेश घोगले,शिवाजी शिंदे, माणिकराव गायकवाड, बंडू पौळ,वेदिका गायकवाड,दिव्या साबळे,विरा सोनवणे, रमेशराव गायकवाड, माजी सरपंच रामराजे गायकवाड,रावसाहेब जाधव,संजय सोनवणे, कृष्णराजे गायकवाड, यश गायकवाड,सोहम गायकवाड,कृष्णा गायकवाड,नारायण गायकवाड,हरिभाऊ गायकवाड,बबन पुंड, यांच्यासह वाचक, हितचिंतक,विद्यार्थी, युवक,जेष्ठ नागरीक यांची उपस्थिती होती

# आ.सुरेश धस यांनी अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना दिला बांधावर जाऊन दिलासा

**आष्टी – (प्रतिनिधी) रविवारी – सोमवारी झालेल्या अतिवृष्टीमुळे आष्टी तालुक्यातील अनेक गावातील शेतकरी नागरिकांना तडाखा दिला असून पिकांचे अतोनात , नुकसान झाले आहे. या भागातील नुकसानग्रस्त भागाचा दौरा करून आमदार सुरेश धस यांनी शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष बांधावर जाऊन त्यांना धीर देत अश्रू पुसण्यासाठी प्राधान्य दिले आहे. विविध ठिकाणी झालेल्या नुकसानीची पाहणी करून त्यांनी तहसीलदार आणि तालुका कृषी अधिकारी यांना सोबत घेऊन तात्काळ पंचनामे आणि नुकसान भरपाई देण्यासाठी कारवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.**

**आज सकाळपासून आमदार सुरेश धस यांनी आष्टी तालुक्यातील धनगरवाडी, कापशी, पांगरा, खडकवाडी, वनवेवाडी, पाटसरा, सुरुडी, धामणगाव, दादेगाव, घाटपिंपरी, देवळाली, खलाटवाडी, डोंगरगांव यासह आदी ठिकाणी शेतकऱ्यांच्या दोन दिवसातील अतिवृष्टीने नुकसान झाले आहे त्या ठिकाणी चिखल असल्यामुळे जमिनीवर चालता येत नसल्यामुळे त्यांनी ट्रॅक्टरच्या हेळक्यावर बसून या भागातील नुकसान झालेल्या भागाची पाहणी केली.**

यामध्ये परिसरातील तुडुंब भरून वाहिलेल्या विहिरी, तसेच कांदा, बाजरी, सोयाबीन, राजमा, आदी पिकांचे झालेले मोठ्या प्रमाणात नुकसानीची माहिती घेऊन तात्काळ सोबत असलेले कृषी अधिकारी गोरख तरटे यांना जलदगतीने पंचनामे करण्याच्या सूचना दिल्या.

त्याच बरोबर..सुरुडी परिसरातील दोन गावतलाव फुटल्याने शेतकऱ्यांचं मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून परिसरातील शेतीतील सुपीक माती वाहून गेले असून त्या ठिकाणी केवळ दगड गोटे राहिलेले आहेत तसेच या परिसरातील अनेक शेतकऱ्यांच्या विहिरी देखील पूर्णपणे बुजून गेल्या आहेत या दोन्ही तलाव दुरुस्तीचे काम तात्काळ करण्यात यावे याबाबत पाटबंधारे विभागाला सूचना केल्या त्याचबरोबर या भागातील शेतकऱ्यांच्या



नुकसानीचे पंचनामे करण्यास सुरुवात झाली आहे.ते तातडीने करण्याच्या सूचना दिल्या.

खडकवाडी परिसरातील नुकसान झालेल्या कांदा व कापूस पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून सर्व पिके पूर्णपणे पाण्यात गेली असल्याचे विदारक चित्र आहे.

तसेच पेठ पांगरा येथील तलाव फुटून परिसरातील शेतकऱ्यांचे शेतीचे मोठे नुकसान झाले आहे त्यामुळे तेथील शेतकरी आक्रोश करत असताना आमदार सुरेश धस यांनी त्यांना मदतीचे आश्वासन दिले. तसेच डाग वस्ती जवळून वाहणाऱ्या पांगरा ते कुत्तरवाडी नदीला पूर आल्याने तूर, कांदा या पिकांच मोठे नुकसान तर झालेच शिवाय तर नदीकाठच्या वसंत मिसाळ व पोपट मिसाळ या दोन भावांची राहती घरे पुराच्या पाण्यात वाहून गेली.

अतिशय जोरदार झालेले अपर्जन्यवृष्टीमुळे

आष्टी ते महिंदा रस्त्यावर असलेल्या सुरुडी नागतळा गावाला जोडणारा पूल पुराच्या पाण्याने पूर्णपणे खचला असून या पुलाची पाहणी करून उपस्थित शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेतल्या . अचानक आलेल्या या पुराच्या लोटामुळे धामणगाव येथील युवक अफरोज बशीर बागवान पाण्यात वाहून गेल्याने दुःखद निधन झाले त्या कुटुंबीयांचे सांत्वनभेट घेऊन धीर दिला. तसेच धामणगाव शहरातून जाणाऱ्या कडी नदीला आलेल्या पुरामुळे नागरिकांच्या राहत्या घराचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले ज्यामध्ये कुंडलिक कुदळे, मालन ससाणे, रघुनाथ पवार, राहुल पवार, अमोल पवार, कैलास पवार, विलास पवार, जयसिंग पवार, अनिता साळवे, हौसराव शिंदे, प्रमोद शिंदे, भाऊसाहेब शिंदे, दीपक शिंदे, भागवत शिंदे, आशाबाई साबळे यांना प्रत्यक्ष भेटून दिलासा दिला आणि नुकसान भरपाई बाबत आश्वासन दिले.घाटा (पिंपरी,)या गावात पुराच्या पाण्यामुळे जवळपास ११ हून अधिक घरातील उडीद, गहू, ज्वारी, या धान्याचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. संसारोपयोगी वस्तूंचे देखील नुकसान झाले तर साठा केलेल्या कांदासह कांदाचाळी या पुरात वाहून गेल्या. तात्काळ यावर प्रशासनाला सूचना देऊन पुरात घरांचे नुकसान झालेल्या नागरिकांना बुधवारी धान्याचा पुरवठा करण्याच्या सूचना दिल्या.तसेच खंडित विद्युत प्रवाहाचे कामे जलदगतीने करून तो पूर्ववत करण्याच्या सूचना महावितरणच्या अधिकाऱ्यांना दिल्या आहेत

देवळाली येथील वाहून गेलेल्या फळबागा, कांदाचाळी,छोटे छोटे पूल,घरांचे झालेले नुकसान याची पाहणी केली.दादेगाव व डोंगरगण येथे आलेल्या पुरामुळे झालेल्या व्यापक नुकसानीचा सविस्तर आढावा आ.धस यांनी प्रत्यक्ष स्थळी जाऊन घेतला.नुकसानभरपाईची कार्यवाही होण्यासाठी संबंधित महसूल व कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना आवश्यक ते निर्देश दिले.



## मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त स्वामी विवेकानंद विद्यामंदिर शाळेमध्ये ध्वजारोहणाचा कार्यक्रम संपन्न

केज/प्रतिनिधी

जीवन विकास शिक्षण मंडळ केज संचलित, स्वामी विवेकानंद विद्यामंदिर माध्यमिक विभाग या शाळेमध्ये मराठवाडा मुक्ती संग्राम दिन अत्यंत हर्षोत्साहा मध्ये साजरा करण्यात आला.याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून अंबेजोगाई येथील सेवानिवृत्त वैद्यकीय अधिकारी तथा कर्नल एम.एच.कांबळे हे उपस्थित होते.तर अध्यक्ष म्हणून संस्थेचे सचिव जी.बी.गदळे यांनी उपस्थिती दर्शविली. इतर मान्यवरांमध्ये संस्थेचे अध्यक्ष अंकुशरावजी इंगळे,कमलाकर मंगरूळकर,माजी सैनिक जनार्दन सोनवणे,शालेय व्यवस्थापन समिती स्वयंअर्थ शाळेचेअध्यक्ष नारायण अण्णा अंधारे, सेवानिवृत्त मु.अ. बाळासाहेब तिडके, शाळेच्यामुख्याध्यापिका शिवनंदा मुळे,प्राचार्य शंकर भैरट तसेच शाळेतील शिक्षक वृंद आदी उपस्थित होते.

स्वामी विवेकानंद विद्यामंदिर माध्यमिक विभाग या शाळेमध्ये दि.१७ सप्टेंबर २०२५ वार बुधवार रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिन साजरा करण्यात आला.याप्रसंगी अंबेजोगाई येथील डॉ. कर्नल एम.एच.कांबळे यांच्या हस्ते ठीक ८:०५ ला ध्वजारोहण पार पडले.याप्रसंगी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते म्हणाले,आज खरं तर हा क्षण आनंदाचा आहे परंतु दुःखही तितकच आहे,कारण अनेकांनी या क्षणासाठी आत्माहुती दिली, आपल्या जीवनाचा असीम त्याग केला. देशामध्ये जवळपास ५६५ संस्थाने होती. भारत स्वतंत्र झाल्या नंतर बहुतांश संस्थाने स्वतंत्र भारतात विलीन झाली.परंतु याला अपवाद तीन संस्थाने होती.जम्मू काश्मीर, जुनागड व हैदराबाद. तेंव्हा त्याकाळी या संस्थांनाच्या विलीकरणाचा प्रश्न फार जटील बनला होता. स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ तसेच तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लभाई पटेल यांचे योगदान अतिशय महत्त्वाचे मानले जाते. याप्रसंगी त्यांनी मराठवाडा मुक्ती संग्रामा तील अनेक प्रसंगांना उजाळा देण्याचा काम केलं.पुढे ते म्हणाले, अशा कार्यक्रमांचं सातत्याने आयोजन झाल पाहिजे कारण ज्यांनी खऱ्या अर्थाने त्याग केला.आजच्या युवा पिढीने त्यांचा आदर्श घेतला पाहिजे. देशा सेवा करण्याची संधी मिळेल अथवा नाही,परंतु प्रत्येकाने शिस्तबद्ध जीवन जगले पाहिजे.इतरांप्रती सहिष्णुता दाखवली पाहिजे.कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सांस्कृतिक विभागप्रमुखप्रबोधकांत समुद्रे यांनी केले.तर आभार शाळेच्या मुख्याध्यापिका शिवनंदा मुळे यांनी मानले.

## खा.सोनवणे म्हणाले रेल्वेची स्वप्नपुर्ती होतेय आता पाणी द्या,अन् फडणवीसांकडून दुष्काळमुक्तीचा शब्द

रेल्वे मार्ग उद्धाटन अन् रेल्वे शुभारंभ प्रसंगी खा.सोनवणेंचे धडाकेबाज भाषण

बीड/प्रतिनिधी

बीडला रेल्वे यावी यासाठी बीड जिल्हा रेल्वे कृती समिती आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांनी काम केले. अनेक वर्ष रेल्वेसाठी संघर्ष सुरू राहिला. दरम्यान,बीड रेल्वेचे स्वप्न आज पुर्ण होत आहे.आजअहिल्यानगर ते बीड रेल्वे सुरू झाली असून बीड ते परळी पर्यंत कामही गतीने सुरू आहे. रेल्वेची स्वप्नपुर्ती होतेय, मुख्यमंत्री साहेब आता बीडला २५ टिएमसी पाणी द्या,अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी केले.यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भाषणात मराठवाडा दुष्काळमुक्त करण्याचे प्रयत्न सुरू आहेत,बीडलाही पाणी आणू,असा शब्द यावेळी दिला.बीड येथील रेल्वे स्थानक येथे अंमळनेर ते बीड नवीन रेल्वे मार्गाचे उद्धाटन आणि बीड ते अहिल्यानगर रेल्वेचा शुभांरभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी व्यासपिठावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार,मंत्री पंकजा मुंडे, खा.रजनीताई पाटील, आ.धनंजय मुंडे, आ.विजयसिंह पंडित, आ.नमीता मुंदडा,आ. विक्रम काळे,माजी आ.भिमराव धोंडे यांची उपस्थिती होती.यावेळी पुढे बोलताना खा.बजरंग सोनवणे म्हणाले, बीड जिल्ह्यातीलनागरिकांना रेल्वे येत असल्याचा आज आनंद होत आहे. अंमळनेर ते बीड नवीन रेल्वे मार्गाचे उद्धाटन आणि बीड ते अहिल्यानगर रेल्वेचा शुभांरभ होत असून बीड रेल्वेसाठी कृती समितीने मोठे काम केले.यात नामदेवराव क्षीरसागर,हनुमंत उपरे, अमोल गलधर आदिंसह विविध क्षेत्रात काम करणाऱ्या जनतेने लढा उभा केला.त्याचमागणी चे आज आपण फलीत पाहत आहोत.मागील पन्नास वर्षांपासून आपण रेल्वेची मागणी करत होतो.आज रेल्वेची मागणी आणि स्वप्नही पुर्ण होत आहे. अहिल्यानगर ते परळी अशी रेल्वेची लांबी ही २६१ किलोमिटर आहे. त्यापैकी मार्च २०२४ पर्यंत ९९ किलोमिटर पुर्ण झाली आणि आपल्या कार्यकाळात आजपर्यंत ६७ लांबी पुर्ण झाली. ज्या दिवशी खासदार झालो, त्यानंतर पहिली बैठक रेल्वेची घेतली.तुमच्या सर्वांच्या आर्शीवादाने खासदार झाल्यानंतर मी सालगडी म्हणून काम करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करत आहे.रेल्वे ट्रॅक टाकून घेण्यापासून प्रत्येक ठिकाणी येणाऱ्या अडचणी सोडविण्या साठी प्रयत्न करतआहे. आतापर्यंत १६ बैठका आपण घेतल्या.रेल्वे अधिकाऱ्यांपासून रेल्वे मंत्र्यांपर्यंत भेटत आहे. याच कारणाने आपल्या रेल्वेच्या कामाला गती मिळालेली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार हे आपल्याला निधी देत आहेत. बीडकरांची बार्शीनाक्या वरील थांब्याची मागणी आहे,त्यासाठी आपला प्रस्ताव गेलेला आहे. रेल्वेमुळे विद्यार्थी, गोरगरिब आणि शेतकऱ्यांच्या मालाची ने-आण करण्यासाठी उपयोग होणार आहे. आता डिझेलवर रेल्वे सुरू होत आहे.परंतु हायस्पिड रेल्वे ही लाईटवर धावणार आहे. त्यासाठी आष्टी आणि सिरसाळा येथे दोन सबस्टेशन होत आहेत. ते काम लकवरच पुर्ण होईल.मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री हे तिजोरी चे मालक आहेत,ते या कामासाठी हात मोकळे सोडतीलच,असा विश्वास आहे.दरम्यान, मराठवाड्याचापाण्याचा अनुशेष भरून काढा. आम्हाला उजनीतून २५ टिमएसी पाणी मांजरा धरणात द्या आणि तिथून ते मांजरसुंब्याला आणि,जेणेकरून आमच्या बीड जिल्ह्यात कायमस्वरूपी दुष्काळ मुक्त होईल,असे खा.सोनवणे म्हणाले.

खा.सोनवणेंना रेल्वेप्रवासाचा मान

बीडला रेल्वे आलीच पाहिजे,अशी मागणी वर्षानूवर्षे सुरू होती. अखेर ही मागणी आता पुर्ण झाली असून दि.१७ सप्टेंबर रोजी बीड ते अहिल्यानगर अशी पहिली रेल्वे सुरू करण्यात आली.या पहिल्या प्रवाशी रेल्वेत खा.बजरंग सोनवणे यांनी प्रवास केला. त्यांच्यासोबत बीड मधील रेल्वे लढ्यात सहभागी झालेले नागरिक देखील सहभागी झाले होते.



### खा.सोनवणेंच्या पोस्टरने वेधले लक्ष

बीड येथील रेल्वे स्थानक येथील अंमळनेर ते बीड नवीन रेल्वे मार्गाचे उद्धाटन आणि बीड ते अहिल्यानगर रेल्वेचा शुभांरभ कार्यक्रमात खा.बजरंग सोनवणे यांचे 'कार्यक्षमखासदार' असे लिहलेले पोस्टर तरूणांनी आणले होते. अगदी सर्व कार्यक्रमात या पोस्टरने लक्ष वेधून घेतले होते. कार्यक्रमांसह रेल्वे प्रवासातही तरूण असे पोस्टर घेवून फिरताना दिसले.कार्यक्रमा दरम्यान,पोस्टर हातात घेत खा.बजरंग सोनवणे तुम आगे बढोच्या घोषणांनी यावेळी तरूणांनी दिल्या.

## मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त पाटोद्यात मस्कानजोगी समाजाला जातीय प्रमाणपत्र वाटप

पाटोदा (प्रतिनिधी) मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून पाटोदा तालुक्यातील मस्कानजोगी वस्ती येथे एक भव्य शिबीर आयोजित करण्यात आले. या शिबिराचे आयोजन राजे छत्रपती शिवाजी महाराज राजस्व अभियान तसेच राजे उमाजी नाईक कागदपत्र अभियान या शासनमान्य उपक्रमांतर्गत करण्यात आले होते.या विशेष शिबिराचे आयोजन भटके विमुक्त विकास परिषद, महाराष्ट्र प्रदेश यांच्या पुढाकाराने तसेच बीड जिल्हा अभियान प्रमुख यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.या उपक्रमांतर्गत वस्तीतील नागरिकांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळावा, त्यांच्याकडे आवश्यक कागदपत्रांची कमतरता भासू नये यासाठी आधार कार्ड, मतदान ओळखपत्र, रेशन कार्ड, जातीचे प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्रांचे वाटप करण्यात आले. विशेष म्हणजे अनेक वर्षांपासून जातीच्या प्रमाणपत्रासाठी भटकंती करणाऱ्या मस्कानजोगी समाजातील कुटुंबांना या शिबिरामध्ये अधिकृत जातीचे दाखले मिळाले. त्यामुळे समाजबांधवांमध्ये मोठा उत्साह व समाधानाचे वातावरण होते.



शिबिराचे उद्घाटन व मार्गदर्शन पाटोदा उपविभागीय अधिकारी तसेच तहसीलदार साहेब यांच्या हस्ते झाले. त्यांनी शासनाच्या विविध योजनांची माहिती देत समाजाने शिक्षण,आरोग्य, रोजगार याकडे अधिक लक्ष द्यावे, शासन सर्वतोपरी पाठबळ देईल असे आश्वासन दिले.या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी भटके विमुक्त विकास परिषद बीड जिल्हा अभियान प्रमुख बबनजी गिरी यांनी विशेष प्रयत्न केले. कार्यक्रमाला उपस्थित राहून समाजबांधवांना मार्गदर्शन करणाऱ्यांमध्ये गोरे सर, नगरसेवक सतीश घोलप, शिवाजी जाधव, महामुनी, संदीप सोनवणे, विकास जाधव, बंडुशेठ कांकरीया, सागर वाघ यांच्यासह इतर मान्यवरांचा समावेश होता.समाजातील नागरिकांना मिळालेल्या जातीच्या दाखल्यामुळे भविष्यात शैक्षणिक प्रवेश, नोकरी व इतर शासकीय योजनांचा लाभ घेणे सुलभ होणार आहे. या शिबिरामुळे मस्कानजोगी समाजामध्ये आनंदाचे वातावरण असून, समाजाने शासनाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे.




## शासकीय तंत्रनिकेतन, बीड येथे मराठवाडा मुक्ती संग्राम दिन व प्रबोधनकार ठाकरे जयंती उत्साहात साजरी

बीड/प्रतिनिधी

शासकीय तंत्रनिकेतन, बीड येथे आज मराठवाडा मुक्ती संग्राम दिन व प्रबोधनकार ठाकरे जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. सकाळी साडे सात वाजता प्राचार्य डॉ. ए. के. वाघमारे यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. यानंतर उपस्थितांनी सामूहिकरित्या महाराष्ट्र गीताचे गायन करून राज्याच्या वैभवाचा गौरव व्यक्त केला.

या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये मराठवाडा मुक्ती संग्रामातील शौर्यगाथा तसेच प्रबोधनकार ठाकरे यांच्या वैचारिक कार्याची माहितीदेण्यात आली.प्रबोधनकार ठाकरे हेसमाजसुधारक, पत्रकार आणि लेखक म्हणून महाराष्ट्राच्या वैचारिक परंपरेतील थोर व्यक्तिमत्त्व मानले जातात.त्यांनी 'प्रबोधन' नियतकालिकातून समाजजागृती केली. अस्पृश्यता निवारण, हुंडाबंदी,अंधश्रद्धा निर्मूलन यांसाठी त्यांनी कार्य केले. 'भिक्षुकशाहीचे बंड' सारख्या ग्रंथातून त्यांनी समाजातील अनिष्ट प्रथा व कर्मकांडावर कठोर प्रहार केला.

या कार्यक्रमास विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.तसेच विभागप्रमुख बनसोडे यू.व्ही. यंत्र अभियांत्रिकी,गिते बी. एम.विद्युतअभियांत्रिकी,वीर एस.बी. संगणक अभियांत्रिकी,गावडे पी. बी.अनुविद्युत,सोहेल सय्यद स्थापत्य व अभिजीत जाधव मुद्रण तंत्रज्ञान यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्र संचालन जिमखाना उपाध्यक्षवाघ डी.जी. आणि सहाय्यक पवार विवेक यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेचे प्रसिद्धी प्रमुखथीगळे व्ही.जी आणि देशमुख व्ही.एस यांचे विशेष सहकार्य लाभले.

## थेरला शिवारात दरोडा – मिसाळ कुटुंबावर चोरट्यांचा जीवघेणा हल्ला! परिसरात भीतीचे वातावरण

पाटोदा (प्रतिनिधी) : पाटोदा तालुक्यातील थेरला शिवारात सोमवारी मध्यरात्री चोरट्यांनी धाड टाकून भीमराव मिसाळ व त्यांची पत्नी सत्यभामा भीमराव मिसाळ यांच्या घरावर दरोडा टाकला. यावेळी चोरट्यांनी घरातील सदस्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न करत लोखंडी रॉडसह जबर मारहाण केली. या घटनेत भीमराव मिसाळ गंभीर जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.



चोरट्यांनी घरातील रोकड, दागिने लंपास केले असल्याचे प्राथमिक माहितीवरून समोर आले आहे. मध्यरात्री झालेल्या या धाडसी दरोड्यामुळे थेरला शिवार आणि परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून नागरिकांनी पोलीस प्रशासनाने तातडीने कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.या हल्ल्यामुळे गावकऱ्यांमध्ये तीव्र संताप असून परिसरातील सुरक्षेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.